सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ३३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २० फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## मै रेखा गुप्ता ईश्वर की... दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी ४ थ्यांदा महिला; राज्यपालांनी मुख्यमंत्री सह ६ आमदारांना दिली मंत्रिपदाची शपथ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० नवी दिल्ली**

भाजप आमदार रेखा गुप्ता यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी शपथ घेतली. दिल्लीच्या चौथ्या आणि भाजपकडून दिल्लीसाठी पहिल्या मुख्यमंत्री म्हणून त्यांचा शपथविधी संपन्न झाला. दिल्लीतील रामलिला मैदानात पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह भाजपचे प्रमुख नेते आणि विविध राज्यांचे मुख्यमंत्री या सोहळ्याला उपस्थिती होते. रेखा गुप्तासह उपमुख्यमंत्री परवेश शर्मा आणि ६ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. दिल्लीचे नायब राज्यपाल एलजी विनयकुमार यांनी सर्वच मंत्र्यांना पद व गोपनियतेची शपथ दिली. दिल्ली विधानसभेत २७ वर्षानंतर सत्ता मिळवण्यात भाजपला यश मिळालं आहे. यापूर्वी, दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदी सुषमा स्वराज, शीला दीक्षित, आतिशी यांनी महिला म्हणून कार्यभार सांभाळला होता. आता, रेखा गुप्त यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली असून शालीमार विधानसभा मतदारसंघातून त्या विजयी झाल्या आहेत. आम आदमी पक्षाच्या तीनवेळा आमदार राहिलेल्या बंदना कुमारी यांचा पराभव करत त्या दिल्लीच्या प्रमुख पदावर विराजमान झाल्या आहेत.

देशाच्या राजधानीत २७ वर्षानंतर भाजपचे कमळ खुलले असून गेल्या १० दिवसांपासून दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाबाबत चर्चा सुरू होती. त्यामुळे, दिल्लीतील मुख्यमंत्रीपदाची माळ नेमकं कोणाच्या गळ्यात पडणार याकडे



देशाचे लक्ष लागले होते. नेहमीप्रमाणे भाजपने दिल्लीसाठी देखील धक्कातंत्र वापरत रेखा गुप्ता यांना भाजप आमदारांचा गटनेता म्हणून घोषित करण्यात आले. त्यानंतर, आज सकाळी त्यांचा शपथविधी सोहळा संपन्न झाला. संघविचारक आणि प्रचारक राहिलेल्या रेखा गुप्ता यांनी शालेय जीवनापासून भाजपसोबत काम केले आहे, विद्यार्थी संघटनेपासून



त्या भाजप व संघ परिवाराशी जोडल्या असून सध्या भाजपच्या महिला राष्ट्रीय उपाध्यक्षा आहेत. त्यामुळेच, भाजपने पहिल्यांदाच आमदार बनलेल्या रेखा गुप्ता यांच्याकडे दिल्लीची जबाबदारी सोपवली आहे.

रेखा गुप्ता यांच्यासह उपमुख्यमंत्री व ५ आमदारांनी दिल्लीच्या मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. आशीष सूद, मनजिंदर सिंह सिरसा, रविंद्र सिंह इंद्राज, कपिल मिश्रा आणि पंकज सिंह या आमदारांनी दिल्लीच्या मंत्रिपदाची शपथ घेतली. भाजपच्या नव्या मंत्रिमंडळात जाट, पंबजी आणि पूर्वांचल सुमदायाचा विचार करुन स्थान देण्यात आलं आहे. भाजपने जातीय समीकरण सांभाळले असून लवकरच मंत्र्यांचे खातेवाटप होईल.

**रेखा गुप्ता यांचा राजकीय प्रवास**

रेखा गुप्ता ह्या संघविचारक राहिल्या असून विद्यार्थी संघटनेपासून त्या भाजप पक्षात कार्यरत आहेत. सन १९९४-९५ ला दौलत राम कॉलेजच्या सचिवपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर, १९९५-९६ मध्ये दिल्ली विद्यापीठात छात्र संघाच्या सचिव राहिल्या असून १९९६-९७ मध्ये दिल्ली विद्यापीठात छात्र संघाच्या अध्यक्ष झाल्या. सन २००३-२००४ ला भाजप दिल्ली युवा मोर्चाच्या सचिव झाल्या, २००४-२००६ ला युवा मोर्चाच्या राष्ट्रीय सचिव झाल्या. त्यानंतर, एप्रिल २००७ ला उत्तरी पीतमपुरा वार्डमधून भाजपच्या नगरसेवक झाल्या. तर, २००७-२००९ महिला कल्याण आणि बाल विकास समितीच्या अध्यक्ष झाल्या. मार्च, २०१० मध्ये भाजपच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली, सध्या रेखा गुप्ता ह्या भाजपच्या महिला मोर्चाच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष आहे.

रेखा गुप्ता यांच्यासोबत ६ मंत्रीहीनी शपथ घेतली यामध्ये प्रवेश वर्मा, आशिष सूद, मनजिंदर सिंग सिरसा, रवींद्र इंद्राज सिंग, कपिल मिश्रा आणि पंकज कुमार सिंग यांचा समावेश आहे.

शपथ घेण्यापूर्वी रेखा गुप्ता यांनी गुरुवारी सकाळी माध्यमांना सांगितले की, 'ही एक मोठी जबाबदारी आहे. माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल मी पंतप्रधान मोदी आणि पक्षाच्या हायकमांडचे आभार मानते. मी कधीच विचार केला नव्हता की मी दिल्लीची मुख्यमंत्री होईन. मी शीश महालात राहणार नाही.शीश महाल हे दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांचे अधिकृत निवासस्थान आहे. अरविंद केजरीवाल यांनी ते बांधले होते. केजरीवाल यांनी नियमांचे उल्लंघन करून ते बांधण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केल्याचा भाजपचा आरोप आहे. भाजपनेही तो निवडणुकीचा मुद्दा बनवला होता.


## कृषीमंत्री माणिकराव कोकाटेंना २ वर्षांचा कारावास : ५० हजार रुपयांचा दंड

### १९९५ च्या प्रकरणात शिक्षा; आमदारकीवर टांगती तलवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० नाशिक**

राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू सुनील कोकाटे यांना २ वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. १९९५ मधील एका प्रकरणात त्यांना ही शिक्षा सुनावण्यात आली. कागदपत्रांची फेरफार आणि फसवणूक केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात आला आहे. या शिक्षेमुळे माणिकराव कोकाटेंच्या आमदारकीवर टांगती तलवार आली आहे.

१९९५ मध्ये कागदपत्रांची फेरफार आणि फसवणुकीच्या आरोपांवरून हा निर्णय देण्यात आला आहे. माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी १९९५ मध्ये माणिकराव कोकाटे यांच्या विरोधात सदनिकांच्या घोटाळ्यांसंदर्भात याचिका दाखल केली होती. माणिकराव कोकाटे आणि त्यांच्या भावावर भादंवि कलम ४२० (फसवणूक), ४६५ (कृत्रिम दस्तऐवज तयार करणे), ४७१ (बनावट दस्तऐवजाचा उपयोग करणे) आणि ४७४ (सत्यता लपवणे) या कलमांखाली गुन्हा दाखल झाला होता. २९ वर्षांनंतर या खटल्याचा आज नाशिक जिल्हा न्यायालयाने निकाल दिला. त्यानुसार माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ सुनिल कोकाटे यांना २ वर्षांचा



कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. या सुनावणीला माणिकराव कोकाटे स्वतः जिल्हा न्यायालयात हजर होते. जिल्हा न्यायालयाने शिक्षा ठोठावताच माणिकराव कोकाटे यांच्याकडून तत्काळ जामीन मिळण्यासंदर्भात हालचारी सुरू झाल्यात आहेत. त्यांनी जामिनासाठी अर्ज केला आहे.

**कोकाटेंच्या आमदारकी, मंत्रिपदावर टांगती तलवार**

या प्रकरणामुळे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे अडचणीत आले आहेत. त्यांच्या आमदारकी आणि मंत्रीवर टांगती तलवार आहे. कारण लोकप्रतिनिधीला दोन किंवा त्यापेक्षा जास्त वर्षांची शिक्षा झाल्यास त्याचे सभागृहाचे सदस्यत्व रद्द होते. तसे झाल्यास माणिकराव कोकाटे यांच्या राजकीय कारकीर्दीला ब्रेक लागू शकतो.

**राष्ट्रवादीच्या दुसऱ्या नेत्याचे मंत्रिपद संकटात**

आता माणिकराव कोकाटे यांच्या रुपाने अजित पवार गटाचा दुसरा मंत्री अडचणीत आला आहे. धनंजय मुंडे यांच्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या दुसऱ्या नेत्याचे मंत्रिपद संकटात सापडले आहे. त्यामुळे आता माणिकराव कोकाटे, अजित पवार आणि राष्ट्रवादी काँग्रेस काय पावले उचलणार, हे बघावे लागेल. तसेच यावरून भाजप आणि शिंदे गटाची भूमिका काय राहील? याकडे लक्ष लागले आहे.

## ...या लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा होणार नाही फेब्रुवारी महिन्याचा हप्ता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मुंबई**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा फेब्रुवारी महिन्याचा हप्ता बँक खात्यात कधी जमा होणार, याकडे लक्ष लागलं असताना एक मोठी अपडेट समोर आली आहे. ती म्हणजे लाखो लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात फेब्रुवारी महिन्याचा हप्ता जमा केला जाणार नसल्याची मंत्रालयातील सूत्रांनी माहिती दिली आहे.

राज्यात लाखो महिलांच्या खात्यात लाडकी बहीण योजनेचे पैसे जमा झाले आहेत. मात्र, आता महायुतीसरकारने निकषांची कात्री लावली आहे. त्यामुळे योजनेतील




अपात्र लाभार्थ्यांची संख्या आणखी वाढणार आहे. राज्यभरात अंगणवाडी सेविकांकडून छाननीची प्रक्रिया सुरू आहे. त्यानंतर आणखी दोन लाख लाभार्थी अपात्र ठरणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण' योजनेच्या अंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात येतात. महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर केली होती. विधानसभा निवडणुकीत ही योजना महायुती सरकारसाठी गेमचेंजर ठरली. साधारण २ कोटी ११ लाख ८६० महिला या योजनेसाठी पात्र ठरल्या होत्या. मात्र, या योजनेतील अपात्र महिलांची संख्या आणखी वाढणार आहे. महिला व बाल विकास खात्याच्या अधिकाऱ्यांकडून छाननी प्रक्रिया सुरू असून फेब्रुवारी महिन्यात आणखी जवळपास २ लाख महिला अपात्र ठरणार आहे. या महिलांना फेब्रुवारीचा हप्ता मिळणार नसल्याचे समजते.

अपात्र ठरविण्यात आलेल्या लाभार्थ्यांमध्ये संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी असलेल्या महिला - २,३०,००० महिला, वय वर्षे ६५ पेक्षा जास्त असलेल्या महिला - १,१०,००० महिला, कुटुंबातील सदस्यांच्या नावे चारचाकी गाडी असलेल्या, नमोशक्ती योजनेच्या लाभार्थी असलेल्या,स्वेच्छेने योजनेतून नाव मागे घेणाऱ्या महिला - १,६०,००० महिला अशा एकूण ५ लाख महिला अपात्र ठरल्या आहेत.

## एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी गाडी बॉम्बने उडवण्याचा उल्लेख

### अज्ञाताकडून गोरेगाव पोलिस ठाण्यात धमकीचा ई-मेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नवी दिल्ली**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. यासंदर्भात गोरेगाव पोलिस ठाण्यात धमकीचा ईमेल करण्यात आला आहे. शिंदे यांची गाडी बॉम्बने उडवण्याचा उल्लेख यामध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे आता पोलिसांकडून ई-मेल पाठवणाऱ्याचा शोध सुरू झाला आहे. वास्तविक शिंदे यांना धमकीची ही पहिली वेळ नाही. या आधी देखील त्यांना अनेकदा धमक्या देण्यात आल्या आहेत.



एक महिन्यापूर्वी देखील उपमुखमंत्री एकनाथ शिंदे यांना एका व्यक्तीने धमकी दिल्याचा प्रकार समोर आला होता. एका २४ वर्षीय तरुणाने एकनाथ शिंदे यांना जीवे मारण्याची धमकी दिली होती. याबाबत त्याने सोशल मीडियावर प्लॅटफॉर्म इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट केला होता. या पोस्टद्वारे त्याने एकनाथ शिंदे यांना धमकी दिली होती. याप्रकरणी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी तरुणावर गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी केली होती. हितेश प्रभाकर धेंडे असे या तरुणाचे नाव होते.

**एकनाथ शिंदे यांना यापूर्वी देखील धमक्या**

उद्धव ठाकरे यांच्या सरकारच्या काळात एकनाथ शिंदे यांच्याकडे गडचिरोलीचे पालकमंत्रीपद देण्यात आले होते. एकनाथ शिंदे यांना त्यावेळी नक्षलवाद्यांकडून धमक्या आल्या होत्या. त्यानंतर पुन्हा धमकीसंदर्भातील बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी अशा प्रकारच्या धमक्यांना घाबरत नसल्याचे म्हटले होते. पोलिस आणि गृहविभागाने याबाबत दखल घेतल्याचे शिंदे म्हणाले होते. मी माझे काम करत राहणार असल्याचेही त्यांनी म्हटले होते.

## ईव्हीएम नाही, पराभवाला आपणच जबाबदार; अमित ठाकरेंनी मांडली रोखठोक भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मुंबई**

२०२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल महाराष्ट्र नवनिर्माण सेना म्हणजेच मनसेसाठी अतिशय धक्कादायक होते. मनसेचा एकही उमेदवार निवडून आला नाही. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी सुपुत्र अमित ठाकरे यांना निवडणुकीत उतरवले होते. परंतु, अमित ठाकरे यांनाही पराभवाचा सामना करावा लागला. यानंतर आता मनसे पक्षाची मान्यता राहणार की नाही, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले. राज ठाकरे यांनी ईव्हीएमच्या संदर्भात शंका उपस्थित केली होती. परंतु, वडिलांच्या भूमिकेशी फारकत घेत, अमित ठाकरे यांनी वेगळे मत व्यक्त केल्याचे सांगितले जात आहे.

विधानसभा निकालानंतर पहिल्यांदाच इतका सन्नाटा



पसरला होता. भाजपाला १३२ जागा मिळाल्या हे समजू शकतो. पण, अजित पवार यांना ४२ जागा? ज्यांच्या जीवावर यांनी राजकारण केले त्या शरद पवार यांना इतक्या कमी जागा कशा? लोकसभेला काँग्रेसचे १३ खासदार जिंकले, त्यांचे १५ आमदार आले? ४ महिन्यांत लोकांच्या मनात इतका फरक पडला? काय झाले, कसे झाले हा संशोधनाचा विषय आहे. लोकांनी आपल्याला मतदान केले फक्त ते आपल्यापर्यंत आले नाही. अशा प्रकारे निवडणुका होत असतील तर त्या न लढविलेल्या बऱ्या, असे राज ठाकरे यांनी म्हटले होते. राज ठाकरे यांचा रोख ईव्हीएमकडे असल्याचे बोलले जात होते. यानंतर आता अमित ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीतील पराभवाला आपणच जबाबदार असल्याचे म्हटले आहे.

## भीषण चकमकीत ४ महिला नक्षली ठार, हॉकफोर्स व बालाघाट जिल्हा पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० गोंदिया**

बालाघाट जिल्ह्यात हॉकफोर्स आणि बालाघाट जिल्हा पोलीस दलाला नक्षलवादी कारवायांविरोधात मोठे यश मिळाले आहे.मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे जंगल परिसरात शोध मोहीम राबविताना ठाणे गढीच्या सूपखार वन परिक्षेत्राच्या रोंडा फॉरेस्ट कॅम्पजवळ हॉकफोर्स, बालाघाट जिल्हा पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये बुधवारी १९ फेब्रुवारी रोजी झालेल्या चकमकीत ४ महिला नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले आहे.

बालाघाट पोलीस विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी मारल्या गेलेल्या ४ महिला नक्षलवाद्यांकडून एक इन्सास रायफल, एक एसएलआर रायफल आणि एक ३०३ रायफल आणि



दैनंदिन वापरातील इतर वस्तू जप्त करण्यात आल्या आहे. ठार करण्यात आलेल्या चार महिला नक्षलवाद्यात २० लाखाच्या इनाम असलेली भोरमदेव एरिया कमेटीची कमांडर आशा रा. दक्षिण बस्तर जिल्हा सुकमा छत्तीसगढ, १४ लाख इनाम असलेली भोरमदेव एरिया कमेटीची सदस्य शीला उर्फ पद्मा उर्फ सरिता रा. पेंटा / जगरगुंडा जिल्हा सुकमा छत्तीसगढ, १४ लाख इनाम असलेली भोरमदेव एरिया कमेटीची सदस्य रंजिता रा. जिल्हा कोंडगाव छत्तीसगड, १४ लाख इनाम असलेली भोरमदेव एरिया कमेटीची सदस्य लख्खे मडावी जिल्हा सुकमा छत्तीसगढ अशी या चकमकीत ठार झालेल्या महिला नक्षलवाद्यांची नावे आहे.या चकमकीत काही महिला नक्षलवादी जखमी झाल्या आहेत. चकमकीनंतर घनदाट जंगलाचा फायदा घेऊन ते पळून गेल्याचे सांगण्यात आले. त्यांचा शोध घेण्यासाठी १२ पोलिस पथकातील ५०० हून अधिक पोलिस बळ अजूनही हॉकफोर्स, सीआरपीएफ कोब्रा आणि बालाघाट जिल्हा पोलीस दलाच्या पथकांकडून जखमी नक्षलवाद्यांचा शोध घेण्यासाठी जंगलात शोध सुरूच आहे.

## काँग्रेस कार्यकारिणीत बदल होण्याची शक्यता: नव्या प्रदेशाध्यक्षांमुळे चर्चा; जुन्या कार्यकर्त्यांना येणार 'अच्छे दिन'

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

प्रदेश काँग्रेसमधील फेरबदलांची अनेक महिन्यांपासून चर्चा सुरू होती. नाना पटोले यांच्या जागी कोणाची वर्णी लागणार याची चर्चा सुरू होती. अखेरीस प्रदेशाध्यक्षपदी बुलढाण्याचे हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती करण्यात करण्यात आली आहे. १९९९ मध्ये जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले होते. तर त्यानंतर ते आमदारही झाले. त्यांच्यासारख्या साध्या व्यक्तीला प्रदेशाध्यक्षपद मिळाल्याने काँग्रेसमध्येदेखील उत्साहाचे वातावरण दिसत आहे. नूतन प्रदेशाध्यक्ष नवीन कार्यकारिणी नियुक्त करणारच आहेत. परंतु, त्याचबरोबर सर्वच जिल्ह्यांच्या कार्यकारिणीदेखील नव्याने तयार करण्यात येणार आहेत.



काँग्रेस पक्षाने नूतन प्रदेशाध्यक्ष म्हणून हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती केल्याने आता प्रदेश कार्यकारिणीत बदल होईलच; परंतु नाशिक जिल्ह्यातदेखील अनेक फेरबदल होण्याची शक्यता आहे. नाशिक जिल्हा कार्यकारिणी जिल्हाध्यक्षांनी अगोदरच बरखास्त केली आहे आणि शहर कार्यकारिणीचे प्रमुख असलेले ॲड. आकाश छाजेड हेच प्रभारी आहेत.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुका झाल्यानंतर आता महापालिका, जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे वेध लागले आहेत. भाजपकडून ज्या पद्धतीने सभासद नोंदणीसह संघटनात्मक बैठका सुरू आहेत, त्या बघता काँग्रेस पक्षातही संघटनात्मक बदल केले जाण्याची शक्यता आहे.

## संपादकीय ......

# परीक्षेतील 'स्ट्रेस मॅनेजमेंट'; करिअरचा पाया!

फेब्रुवारी ते मार्चदरम्यान बोर्डाच्या दहावी, बारावीच्या, एप्रिलमध्ये अभियांत्रिकी व वैद्यकीयची सीईटी आणि मेमध्ये होणारी नीट आणि जेईई अॅडव्हान्स या करिअरचा पाया रचणार्या परीक्षा होत आहेत. सलग चार महिने कराव्या लागत असलेल्या अभ्यासाचा प्रचंड ताण मुला-मुलींवर असल्याने या तणावाचे व्यवस्थापन करणे अत्यावश्यक ठरते.

बहुतांश सर्वच दहावी, बारावी बोर्डाच्या परीक्षा सुरू झालेल्या आहेत. बारावीचे दोन पेपरही झालेले आहेत. दहावीतून बारावीत जाण्यासाठी आणखी दोन वर्षे शिल्लक आहेत. आयआयटी, एम्स की आयआयएम यापैकी कशाची निवड करायची, यासाठी कराव्या लागणार्या तयारीचा पाया मजबूत करण्यासाठी दहावीच्या विद्यार्थ्यांना पुढील दोन वर्षे पुरेशी आहेत; पण बारावी बोर्डाची परीक्षा देणार्या विद्यार्थ्यांचे घोडामैदान मात्र अगदीच जवळ आहे. अभियांत्रिकी आणि वैद्यकीयच्या दोन्ही सीईटी परीक्षा एप्रिलमध्ये आहेत. त्यानंतर लगेच नीट आणि जेईई अॅडव्हान्स मे महिन्यात द्यावी लागणार आहे; मात्र सध्या फेब्रुवारीत सुरू झालेली उच्च माध्यमिक शालांत परीक्षा १५ मार्चपर्यंत चालणार आहे. म्हणजेच फेब्रुवारी, मार्च, एप्रिल आणि मे असे सलग चार महिने बारावीच्या मुला-मुलींवर अभ्यासाचा एवढा ताण आहे की, काही विद्यार्थ्यांचा कोंडमारा होत असल्याचे त्यांच्या गट चर्चेतून स्पष्ट जाणवते. सध्या तरी परीक्षांचा हा तणाव कसा घालवता येईल, याकडे पालकांनीही लक्ष देण्याची गरज आहे.

बहुतांश सर्वच दहावी, बारावी बोर्डाच्या परीक्षा सुरू झालेल्या आहेत. बारावीचे दोन पेपरही झालेले आहेत. दहावीतून बारावीत जाण्यासाठी आणखी दोन वर्षे शिल्लक आहेत. आयआयटी, एम्स की आयआयएम यापैकी कशाची निवड करायची, यासाठी कराव्या लागणार्या तयारीचा पाया मजबूत करण्यासाठी दहावीच्या विद्यार्थ्यांना पुढील दोन वर्षे पुरेशी आहेत; पण बारावी बोर्डाची परीक्षा देणार्या विद्यार्थ्यांचे घोडामैदान मात्र अगदीच जवळ आहे. अभियांत्रिकी आणि वैद्यकीयच्या दोन्ही सीईटी परीक्षा एप्रिलमध्ये आहेत. त्यानंतर लगेच नीट आणि जेईई अॅडव्हान्स मे महिन्यात द्यावी लागणार आहे; मात्र सध्या फेब्रुवारीत सुरू झालेली उच्च माध्यमिक शालांत परीक्षा १५ मार्चपर्यंत चालणार आहे. म्हणजेच फेब्रुवारी, मार्च, एप्रिल आणि मे असे सलग चार महिने बारावीच्या मुला-मुलींवर अभ्यासाचा एवढा ताण आहे की, काही विद्यार्थ्यांचा कोंडमारा होत असल्याचे त्यांच्या गट चर्चेतून स्पष्ट जाणवते. सध्या तरी परीक्षांचा हा तणाव कसा घालवता येईल, याकडे पालकांनीही लक्ष देण्याची गरज आहे.

पेपरचा अभ्यास करताना, अगदी प्रत्यक्ष पेपर सोडवताना 'स्ट्रेट इंडेक्स' सर्वाधिक असतो. आता माझे कसे होणार? पेपर सोपा जाणार का? या अनावश्यक प्रश्नांच्या धास्तीने विद्यार्थी अर्धा गारद होत असतो. अशा स्थितीत विद्यार्थ्यांनी नाउमेद होऊ नये. यासाठी मानसशास्त्रज्ञ आणि शिक्षण तज्ज्ञांनी काही टिप्स सांगितलेल्या आहेत. सर्वात महत्त्वाचा सल्ला म्हणजे, या काळात विद्यार्थ्यांनी समतोल आहार घ्यावा, व्यायाम करावा आणि किमान आठ तासांची पुरेशी झोप घ्यावी. कारण, जेवढी झोप जास्त, तेवढी मनाची एकाग्रता जास्त. वाचलेले लक्षात राहणे आणि ते योग्यवेळी आठवणे यासाठी एकाग्रता महत्त्वाची असते. अभ्यास करताना आणि परीक्षेवेळी मनात येणार्या नकारात्मक विचारांना थारा देऊ नका. कोणत्याही नकारात्मक ऊर्जेला लांब ठेवा. या काळात भरपूर पाणी प्या. नकारात्मक विचार आणि तणाव दूर करण्यासाठी परीक्षेच्या आधी आणि परीक्षेदरम्यान शांत आणि एकाग्र राहण्याचा प्रयत्न करा. डोळे बंद करून दीर्घ श्वास घ्या. यातून शरीर आणि मेंदूच्या पेशींना आराम मिळतो आणि तणाव निवळतो.

परीक्षेत उत्तम कामगिरी करायची असेल, तर अभ्यास करताना मोबाईलपासून स्वतःला जास्तीत जास्त दूर ठेवा, व्हॉटस्अॅप, फेसबुक, इन्स्टाग्राम यासारख्या सोशल मीडियापासून स्वतःला दूर ठेवा.

एकाचवेळी खूप सारी घोकंपट्टी करण्याऐवजी दररोज थोडा थोडा केलेला अभ्यास स्मरणात ठेवणे आणि तो योग्यवेळी आठवणे सोयीचे असते. जे वाचले ते 'रिकॉल' होण्यासाठी दररोजच्या प्रत्येक तासाचे नियोजन करा. याचा फायदा असा होईल की, ऐन परीक्षेच्या दिवशी एकाचवेळी खूप अभ्यास करण्याचा दबाव येणार नाही. परीक्षेच्या आदल्या दिवशी बहुसंख्य विद्यार्थी रात्री उशिरापर्यंत जागतात. ही पद्धत चुकीची आहे. रात्री उशिरापर्यंत केलेला अभ्यास स्मरणात राहत नाही. त्यामुळे तणाव वाढतो आणि त्याचा परिणाम पेपरवर होतो.

भारतीय शिक्षण व्यवस्थेतील दोषांवर नेमके बोट ठेवणारा 'थ्री इडियटस्' हा चित्रपट २००९ मध्ये आला. पालकांच्या अपेक्षांचे ओझे वाहताना त्यांच्या मुलांची विद्यार्थीदशा कशी होरपळून जाते, त्याला जे बनायचे असते ते आयुष्यात न मिळता आई-वडिलांच्या इच्छा-आकांक्षेपोटी केवळ इंजिनिअर, डॉक्टर बनण्याचे ओझे त्यांच्यावर कसे लादले जाते? काही विद्यार्थी फक्त घोकंपट्टीने कसे मेरिटमध्ये येतात, यावर भाष्य करणार्या या चित्रपटाने लाखो पालकांचे डोळे उघडले. आताही जेव्हा जेव्हा राष्ट्रीय दूरचित्रवाणीवर हा सिनेमा लागतो तेव्हा विद्यार्थी आणि पालक अत्यंत आवडीने हा सिनेमा बघतात. कारण, हा कॉमेडीपट असला, तरी तो विद्यार्थी आणि पालकांच्या अतिमहत्त्वाकांक्षेला लगाम घालणारा संदेश देतो आणि हसवता हसवता त्यांना अंतर्मुखही करतो.


न्यूरोसायन्स असे सांगते की, वयाच्या १७ वर्षांपर्यंत स्वतःच निर्णय घेण्याइतपत मुलांचा मेंदू परिपक्व झालेला नसतो. वयाच्या १८ ते २० वर्षांदरम्यान मेंदूचा निर्णय क्षमता विकसित करणारा भाग परिपक्व होतो. बारावीची परीक्षा हा करिअरच्या सर्वच प्रवेश परीक्षांचा पाया असला, तरी ९० टक्के विद्यार्थी बारावीत १७ ते १८ वर्षांचे असतात. त्यामुळे करिअर अभियांत्रिकीमध्ये करायचे की वैद्यकीय क्षेत्रात करायचे? मॅनेजर बनायचे, सीए बनायचे की आयएएस परीक्षा देऊन सनदी अधिकारी व्हायचे, हे निर्णय घेण्याची परिपक्वता त्यांच्यात आलेली नसते. त्यामुळे पालकांनी आधी बारावीची परीक्षा पास होऊ देणे आणि मुला-मुलींनी वयाची १८ वर्षे पूर्ण (या वयात मेंदूचा प्री फ्रंटल कॉर्टेक्स हा कपाळामागील भाग परिपक्व झालेला असतो.) होऊ देणे गरजेचे असते. आपल्याला नेमके काय बनायचे आहे? कोणत्या गोष्टीला प्राधान्य द्यायचे आहे? आपले सामाजिक वर्तन कसे असले पाहिजे, याबाबतची जाण आणि भान येण्याची ही अवस्था असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या करिअरचा पाया स्वतः न रचता मुलांची १८ वर्षे पूर्ण होऊ द्यावी आणि त्यांच्याशी चर्चा करूनच त्यांच्या आवडीनुसार करिअरची निवड करू द्यावी. पालकांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरची लढाई त्यांनाच लढू द्यावी. फार तर त्यांना आर्थिक बळ द्यावे, योग्य मार्गदर्शन करावे, प्रोत्साहन द्यावे, तेव्हा ते स्वतःच स्वतःचे सफल सेनापती बनतील.




## पोट-मांड्यांवरची चरबी होईल झपाट्यानं कमी, धण्याचं पाणी अतिशय सोपा उपाय, करतो बॉडी फॅटपासूनही सुटका

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

अगदी लहानपणापासूनच मुलांमध्ये लठ्ठपणा वाढताना दिसत आहे. यामध्ये तरुणपिढीचा देखील समावेश आहे. खाण्यापिण्याच्या सवयी, सततचे जंक फूड, अपुरी झोप आणि अधिक प्रमाणात वाढलेला ताण यामुळे आपल्या आरोग्यावर परिणाम होतो आहे. आपल्या प्रत्येकाला सध्या फिट आणि स्लीम दिसावं असं वाटतं परंतु, पोटावरची आणि मांड्यांवरची चरबी वाढलेली पाहून नेमकं काय करावं सुचत नाही.



**धण्याच्या पाण्याचे फायदे** - धण्याच्या पाण्यात अनेक पोषक घटक असतात जे आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात. त्यात जीवनसत्त्व, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असते. या पाण्याचे सेवन केल्याने पचन सुधारते तसेच चयापचय देखील वाढतो. हे शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात. काही अभ्यासातून असे समजले आहे की, धण्याचे पाणी प्यायल्यानं वजन कमी होतं. पण फक्त धण्याचं पाणी पिऊन वजन कमी होत नाही तर पुरेसा व्यायाम आणि योग्य आहार पद्धत अवलंबल्यामुळे वजन कमी होते.

**२. बॉडी फॅट कमी करण्यासाठी आहार** - बॉडी फॅट कमी करण्यासाठी निरोगी आहार घेणे आवश्यक आहे. तुमच्या आहारात फळे, भाज्या, धान्य आणि प्रथिनेयुक्त पदार्थांचा समावेश करा. तसेच जंक फूड, प्रक्रिया केलेले पदार्थ आणि साखरयुक्त पदार्थ खाऊ नका.

फळे आणि भाज्यांमध्ये कॅलरीज कमी आणि फायबर जास्त प्रमाणात असते. फायबरमुळे पोट भरल्यासारखे वाटते. कडधान्यांमध्ये भरपूर फायबर आणि पोषक तत्व असतात. जे तुम्हाला ऊर्जा देतात आणि वजन कमी करण्यास मदत करतात.

प्रथिने स्नायू तयार करण्यास आणि ते मजबूत करण्यास मदत करतात. ज्यामुळे तुम्हाला पोट भरल्यासारखे वाटते. ओमेगा - ३ फॅटी अॅसिड्स वजन कमी करण्यास मदत करु शकतात. यामुळे चयापचय सुधारते आणि पोट भरल्यासारखे वाटते.

**३. वजन कमी करण्यासाठी टिप्स** - वजन कमी करण्यासाठी दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम करणे महत्त्वाचे आहे. यामुळे शरीर सक्रिय राहाण्यास मदत होते.

पुरेशी झोप न घेतल्याने आपले वजन झपाट्याने वाढू लागते. त्यासाठी दररोज ७ ते ८ तासांची झोप घ्या.

ताणामुळे वजन वाढू शकते. ताण कमी करण्यासाठी योग, ध्यान किंवा विश्रांती घ्या.

भरपूर प्रमाणात पाणी प्या. ज्यामुळे तुमचा चयापचय वाढेल. दररोज ८ ते १० ग्लास पाणी प्या.

# आंबा बाग किंवा नवीन कलमांना पाणी व्यवस्थापन कसे करावे, जाणून घ्या सविस्तर




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक** - आंबा बागेतील पाणी व्यवस्थापन करण्यासाठी, जमिनीचा प्रकार, हंगाम, पाण्याची उपलब्धता या गोष्टींचा विचार करावा लागतो. आंबा हे पावसाच्या पाण्यावर येणारे पीक असले तरी, कलमे लावल्यानंतर पहिली दोन ते तीन वर्षे पाणी देणे आवश्यक असते.

दरम्यान नव्याने आंबा बागतयार झालेली असल्यास या आंबा बागेस लहान फळधारणा होत असते. अशावेळी फळगळ कमी करण्यासाठी पाणी व्यवस्थापन करणे महत्वाचे ठरते. या काळात नेमके आंबा बाग पाणी व्यवस्थापनकसे करावे, हे जाणून घेऊयात....


**आंबा बाग पाणी व्यवस्थापन**- वाटाणा ते सुपारी आकाराची फळधारणा झालेल्या बागेतील फळांची गळ कमी करण्यासाठी, पाण्याच्या उपलब्धतेनुसार १५० ते २०० लिटर पाणी प्रति झाड याप्रमाणे १५ दिवसांच्या अंतराने पाण्याच्या तीन ते चार पाळ्या द्याव्यात.

झाडाच्या बुंध्याभोवती गवताचे आच्छादन करावे.नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना हिवाळ्यात पहिल्या वर्षी आठवड्यातून एकदा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसांतून एकदा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून एकदा प्रत्येक, कलमाला दोन बादल्या (३० लिटर) पाणी द्यावे. उन्हाळ्यात पाणी वरीलप्रमाणेच परंतु दोनवेळा (दुप्पट मात्रा) दयावे.

जागेवरच रोपे वाढवून त्यावर कलमे केल्यास त्यांना पाणी द्यावे लागत नाही.

ओलावा टिकवून ठेवण्यासाठी आंबा कलमांना केलेल्या अळ्यामध्ये गवताचे आच्छादन करावे.

- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र इगतपुरी






# गुरुवारी गजानन महाराज प्रकट दिन: स्वामींची दैवी कृपा, दिला आदेश अन् महाराजांचे अलौकिक कार्य

गुरुवार, २० फेब्रुवारी २०२५ रोजी गजानन महाराज प्रकट दिन आहे. माघ वद्य सप्तमी म्हणजे २३ फेब्रुवारी १८७८ रोजी बुलडाणा येथील शेगाव येथे गजानन महाराज दिगंबर अवस्थेत लोकांच्या दृष्टीस पडले. गजानन महाराजांवर ब्रह्मांडनायक असलेल्या स्वामी समर्थ महाराजांची असीम कृपा होती. स्वामींचे गजानन महाराजांना दैवी मार्गदर्शन लाभले होते. स्वामी समर्थांच्या आदेशानुसारच गजानन महाराजांनी अलौकिक कार्य करत भक्तांचे कल्याण केले, असे सांगितले जाते.

अक्कलकोटचे स्वामी समर्थ महाराज हे दत्तात्रेयांचे पूर्णवतार मानले जाते. स्वामींचे कोट्यवधी भक्तगण आहेत. स्वामींची शिष्यपरंपराही मोठी थोर आहे. याच शिष्यपरंपरेतील एक दैवी शिष्य असे सहज म्हणता येतील, असे शेगावीचे गजानन महाराज आहेत. स्वामी समर्थ महाराज आणि गजानन महाराज यांच्या चरित्रात अनेक साम्ये आढळतात, असे सांगितले जाते. गुरुवारी गजानन महाराज प्रकट दिन आल्यामुळे स्वामी महाराज आणि गजानन महाराज या दोघांचे केलेले पूजन, नामस्मरण, आराधना, जप-मंत्र पठण अतिशय शुभ आणि पुण्यफलदायी मानले जाते, असे म्हणतात. बीडकर महाराज, शंकर महाराज आणि काळबोवा (पुणे), नृसिंह सरस्वती (आळंदी), सीताराम महाराज (मंगळवेढे), साईबाबा (शिर्डी), देवमामलेदार (नाशिक), रांगोळी महाराज (मालवण), श्रीकृष्ण सरस्वती (कोल्हापूर), स्वामीसुत (मुंबई), बाळप्पा महाराज (अक्कलकोट), ब्रह्मनिष्ठ वामनबुवा (बडोदे), धोंडिबा पलुस्कर (पलुस) आणि गजानन महाराज (शेगांव) आदी अनेक नावे अगदी सहजपणे सांगता येतील. या शिष्यवृंदांची चरित्रेही साधकांना सदैव स्फूर्ती देत राहतात, असे सांगितले जाते.

स्वामी समर्थ महाराज आणि गजानन महाराज यांच्यात अनेक प्रकारे साम्य

अक्कलकोटचे स्वामी समर्थ महाराज आणि गजानन महाराज यांच्यात अनेक प्रकारे साम्य आढळते, असे सांगितले जाते. दोघेही परमहंस सन्यासी होते, दोघेही आजानबाहू होते, दोघेही अत्यंत गूढ बोलत. गजानन महाराज स्वामी समर्थ समाधीस्त होण्याच्या काही दिवस आधी शेगावात प्रगट झाले. या दोन महापुरुषांची भेट झाली, असे अनेकांचे मत आहे. स्वामी समर्थांप्रमाणे गजानन महाराज हे स्वयंभू होते. दोघांचे चरित्र वाचल्यावर त्यांच्यातील साम्य प्रकर्षाने लक्षात येते आणि हे दोघे भौतिक दृष्ट्या दोन दिसले तरी प्रत्यक्षात एकच असावे असे वाटते, असे अनेकजण म्हणतात.

**स्वामी समर्थ आणि गजानन महाराजांची भेट**- गजानन महाराज शेगावला येण्यापूर्वी कुठे होते? ते कुठून आणि कसे आले? या संबंधीचे वर्णन दासगणू महाराजांनी लिहिलेल्या श्री गजानन विजय ग्रंथात



नाही. परंतु, तुकाराम रामचंद्र नागलकर यांनी याबाबत काही माहिती लिहून ठेवल्याचे सांगितले जाते. श्री गजानन महाराज शेगावला येण्याआधी अक्कलकोटला स्वामी समर्थांच्या आश्रमात होते. तिथे त्यांनी आपले बालपण घालविले. अक्कलकोट स्वामींजवळ एक दिवस गजानन महाराज पहाटेच्या वेळी पोचले. त्यावेळी अक्कलकोट स्वामी भक्तांना उपदेश करीत होते. महाराज स्वामींना भेटताक्षणी त्यांनी एकमेकांना परस्पर ओळखले. स्वामींनी बाल गजाननाची मूर्ती न्याहाळली. सिद्धपुरुष होण्याचा आशिर्वाद दिला. त्या दिवसापासून बाल गजानन स्वामींच्या आश्रमी राहू लागले. दिगंबर अवस्थेतील बाल गजाननाची मूर्ती आणि त्यांची तेजस्वी मुद्रा बघून दर्शनार्थी भक्त स्वामींबरोबर बाल गजाननाच्या पाया पडत. अशा प्रकारे स्वामींनी बाल गजाननास आपल्याजवळ ठेवून त्यांना आध्यात्मिक ज्ञानाचे धडे दिले व आपल्या समाधीची त्यांना जाणीव करून दिली, असे सांगितले जाते.

स्वामींनी आदेश दिला की, विदर्भात जा, शेगाव येथे प्रकट हो

अक्कलकोट स्वामींनी गजानन महाराजांना सांगितले की, तू विदर्भात जा आणि शेगाव या गावी प्रकट हो. तिकडच्या लोकांना नामस्मरणाचे महत्त्व पटवून दे. नामस्मरण हे एक चिलखत आहे. नियतीने कितीही वार केले तरी आत कुठेही जखम होत नाही. शेगावला जाण्यापूर्वी नाशिकला जा, तिथे श्रीरामाचे दर्शन घे आणि मग पुढे जा. स्वामींचा आदेश घेऊन महाराजानी श्रीराम मंदिरी जाऊन दर्शन घेतले. तिथे उबंरठ्यावरती डोके ठेवले तर मंदिरातील घंटा आपोआप वाजू लागल्या. हे पाहून मंदिरातील पुजारी घाबरला त्याला वाटले की ही भुताटकी आहे काय? पण प्रत्यक्ष श्रीराम मंदिरात भुतावळींना श्रीरामांच्या आज्ञेशिवाय प्रवेश नाही. मग असे भलते काय होत आहे, असे मनात म्हणत त्याने श्रीराम प्रभूंसमोर हात जोडले. तेवढ्यात श्रीराम चरणी वाहिलेली फुले गजानन महाराजांच्या मस्तकावर येऊन पडली. ते पाहून पुजारी गाभाऱ्यातून बाहेर आला आणि ते दृश्य पाहून मनोमन विचार केला ही कोणी साधारण व्यक्ती नाही आणि त्याने महाराजांच्या चरणी लोटांगण घातले. महाराज त्याच्या डोक्यावरून आईच्या ममतेने हात फिरवून म्हणाले की, अरे तुझे जीवन पिंजऱ्यातल्या पोपटासारखे झाले आहे. तुझ्या अंतरी अजूनही षडरिपु पशु बनून राहिलेले आहेत त्यांना दूर कर. अखंड श्रीराम नाम घे आणि मुक्त होऊन जा. पुजारी गहिवरला आणि त्याने वरती पहिले तर तिथे कोणीच नव्हते. त्याने इकडे तिकडे बरेच शोधाशोध केली पण ती दिव्य विभूती त्याला काही भेटली नाही. पण आता तो अंतर्बाह्य शुद्ध झाला होता.

**गजानन महाराजांचे भक्तांना कालातीत आश्वासन**- भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे. हम गया नही जिंदा है, असे स्वामी समर्थ महाराजांनी भाविकांना आश्वस्त केले होते. अगदी त्याचप्रमाणे अवतार सांगता करताना गजानन महाराज म्हणाले की, मी गेलो ऐसे मानू नका । भक्तित अंतर करू नका । कदा मजलागी विसरु नका । मी आहे येथेच ।। दुःख न करावे यत्किंचित । आम्ही आहोत येथेच । तुम्हा सांभाळण्यापरी सत्य । तुमचा विसर पडणे नसे ।। यावरून स्वामी समर्थ महाराजांनी तसेच गजानन महाराजांनी आपल्या भाविकांना आपण कायम तुमच्यासोबत असल्याची ग्वाही दिल्याचे दिसून येते, असे म्हटले जाते. आजही लाखो भाविक गजानन महाराजांच्या चरणी लीन होतात. नतमस्तक होतात. 'श्री गजानन विजय' या ग्रंथांचे नित्यनेमाने पारायण केले जाते. प्रकटदिनानिमित्ताने महाराजांचे मनोभावे स्मरण करूया आणि म्हणूया...

**।। श्री गजानन जय गजानन।।**
**।। गण गण गणात बोते ।।**
**।। श्री स्वामी समर्थ ।।**
**।। अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ।।**

# १५ हजार रुपयांत दिले बोगस जन्मदाखले ! मनसेचा थेट आरोप, शासनाला निवेदन; प्रशासनाची सारवासारव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**- तहसील कार्यालयांतर्गतआवश्यक कागदपत्रांची पडताळणी न करता काही दाखले प्रत्येकी १५ हजार रुपयांत दिल्याची तक्रार मनसेचे शहराध्यक्ष धीरज तायडे यांनी मंगळवारी शासनाकडे केली. यावर महसूल प्रशासनाची सारवासारव सुरू आहे.

अमरावती तहसील कार्यालयात जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेले तहसीलदार यांनी जन्माचे दाखले न देता नायब तहसीलदार यांनी दिलेले आहे. तहसीलदार प्राधिकृत असताना नायब तहसीलदारांना हे अधिकार कोणी दिले, असा सवाल हिवसे यांनी केला आहे. दलालांना येथे थेट प्रवेश आहे व त्यांच्याच मार्फत प्रत्येकी १५ हजार रुपये घेण्यात येऊन फक्त आधार कार्ड व वृत्तपत्रातील जाहीरनामा याचा आधार घेऊन काही बांगलादेशी नागरिकांना देण्यात आल्याचा आरोप तक्रारीमध्ये करण्यात आलेला आहे.

बहुतेक प्रकरणात टीसी नाही, ज्या प्रकरणात टीसी जोडल्या आहेत. त्यावर खोडतोड आहे तसेच शिक्के नाहीत तलाठी, मंडळ अधिकारी किंवा महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचा घरचौकशी अहवाल नाही. काही प्रकरणात आउटवर्डसारखाच आहे. प्रकरणात जोडलेल्या टीसी व आधार कार्ड दुसऱ्या जिल्ह्यातील असल्याने चुकीच्या लोकांना जन्म व मृत्यूचे दाखले देण्यात आल्याचा आरोप तक्रारीत आहे.

याची प्रशासन कशाप्रकारे दखल घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

कार्यकारी दंडाधिकारी असल्याने नायब तहसीलदार यांच्या स्वाक्षरीचे दाखले आहेत.

या सर्व प्रकरणांची चौकशी व कागदपत्राची पडताळणी करण्यात येणार आहे. यामध्ये काही चुकीचे आढळल्यास कारवाई निश्चित होईल.

**अनिल भटकर, एसडीओ तथा आरडीसी.**

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २० फेब्रुवारी २०२५ शहर/ग्रामिण



## छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह विधान करणाऱ्यांचे मुंडके छाटा त्याची माळ करून तुळजाभवानीच्या गळ्यात घाला

### कालीचरण महाराजांची संतप्त प्रतिक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अकोला–** छत्रपती शिवाजी महाराज यांची आज जयंती असून अनेकांनी सोशल मीडियावरून अभिवादन केले आहे. यात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी मात्र ट्विट करत 'श्रद्धांजली' अर्पण केली आहे. त्यांच्या या ट्विटमुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. श्रद्धांजली हा शब्दप्रयोग त्यांनी केला असून या ठिकाणी अभिवादन असा शब्द वापरायला पाहिजे होता. यावरून अनेकांनी टीका करण्यास सुरू केले आहे. त्यातच आता कालीचरण महाराज यांनी यावर संतप्त प्रतिक्रिया दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान करणारे आणि त्यांचा अपमान करणाऱ्यांचे मुंडके छाटा. त्यांच्या मुंडक्याची माळ तुळजाभवानीच्या गळ्यात घाला, अशी संतप्त प्रतिक्रिया कालीचरण महाराज यांनी दिली आहे. तसेच राहुल गांधी यांच्यासारख्या मूर्ख माणसावर काय बोलायचे? असा सवालही कालीचरण महाराजांनी केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती कार्यक्रमांमध्ये सर्व हिंदूंनी सहभागी व्हा. छावा चित्रपट टॅक्स फ्री झाला पाहिजे, नाही झाला तरी सर्व हिंदूंनी हा चित्रपट पाहिलाच पाहिजे या चित्रपटातून मुस्लिमांनी किती अत्याचार केला हे पाहायला मिळेल, असे ते म्हणाले.





उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राहुल गांधींवर टीका केली आहे. एकनाथ शिंदे म्हणाले, हा छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान आहे. संपूर्ण महाराष्ट्राचा अपमान आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा ते वारंवार अपमान करत आले आहेत. आता त्यांची मजल छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापर्यंत पोहोचली आहे. हे तमाम शिवभक्तांचा अपमान आहे. हे चुकून झालेले नाही. हे त्यांची जीभ घसरलेली नाही, तर हे त्यांनी जाणीवपूर्वक केलेले विधान आहे. त्यांनी केलेल्या या विधानावर त्यांनी माफी मागायला पाहिजे.

छत्रपती संभाजीराजे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. जयंतीच्या दिवशी कोणी श्रद्धांजली अर्पण करते का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. छत्रपती संभाजीराजे म्हणाले, जयंतीच्या दिवशी कोणी श्रद्धांजली अर्पण करते का?' जयंती हा साजरा करण्याचा, प्रेरणा घेण्याचा दिवस असतो. त्यामुळे अशा वेळी 'श्रद्धांजली' हा शब्दप्रयोग चुकीचा असल्याचे संभाजीराजे यांनी सांगितले आहे. शिवजयंती ही महाराजांच्या विचारांची पुनर्स्मृती करण्याची संधी असते, श्रद्धांजली नव्हे. त्यामुळे सार्वजनिक नेत्यांनी भाषेची आणि परंपरांची योग्य जाण ठेवून विचारपूर्वक शब्दप्रयोग करावा, असेही छत्रपती संभाजीराजे म्हणाले.

## रेवट्याखेडात वृध्देची धिंड काढल्याच्या प्रकरणात

## निलंबितहेड कॉन्स्टेबल दिपक सोनाळेकर यांचा अपघाती मृत्यू

### चिखलदऱ्याच्या घाटात दगडावर धडकली कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०चिखलदरा–** रेयट्याखेडात जादुटोण्याच्या संशयावरून वृध्देची धिंड काढल्याचा गुन्हा दडपल्याचा ठपका ठेवत अमरावती रेंजच्या आयजींनी निलंबीत केलेले चिखलदरा पोलिस ठाण्यातील हेड कॉन्स्टेबल दिपक सोनाळेकर यांचा आज १९ फेब्रुवारी रोजी चिखलदऱ्याच्या घाटात अपघाती मृत्यू झाला. दिपक सोनाळेकरची भरधाव कार दगडावर धडकली होती. चिखलदरा ते धामणगाव गढी मार्गावर असलेल्या ओशो पाईन्टनजीकच्या आडनदीच्या पुलाजवळ हा अपघात घडला.

दिपक देवराव सोनाळेकर (ब.नं.५५७), रा. पार्वतीनगर क्रमांक १, अकोली रोड, अमरावती असे मृतकचे नाव आहे. रेयट्याखेडा प्रकरणात निलंबन झाल्यानंतर दिपक सोनाळेकर हे १८ फेब्रुवारी रोजी रात्री चिखलदरा पोलिस ठाण्यात त्यांच्याकडेअसलेल्या पेंडींग तपासाच्या डायरी देण्यासाठी आले होते. ठाण्यातील कामकाज झाल्यानंतर दिपक सोनाळेकर यांनी चिखलदऱ्यात हेरिकन



पाईन्टवर असलेल्या पोलिस विश्राम गृहात रात्री मुक्काम केला. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजताच्यासुमारास दिपक सोनाळेकर यांच्या कारने अमरावतीला येण्यासाठी निघाले. परंतु, त्यांची कार चिखलदरा ते धामणगाव गढी मार्गावर आडनदीच्या पुलाजवळ आली असता अचानक कार अनियंत्रीत झाली आणि कार दगडावर जोरदार धडकली. याबाबत माहिती मिळताच चिखलदरा पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठून दिपक सोनाळेकर यांना तातडीने अचलपुर उपजिल्हा ग्रामीण रूग्णालयात दाखल केले. परंतु, तेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

दिपक सोनाळेकर हे पूर्वी एलसीबीमध्ये कार्यरत होते. एलसीबीमध्ये एका प्रकरणात चौकशी झाल्यानंतर दीड वर्षापूर्वी त्यांना डयूटीपासवर चिखलदरा ठाण्यात पाठविण्यात आले आणि त्यानंतर त्यांची तेथे कायम ऑर्डर करण्यात आली. अशातच महिनाभरापूर्वी चिखलदरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत जादुटोण्याच्या संशयावरून वृध्देच्या तोंडाला काळीमा फासून, गळयात चप्पलांचा हार टाकून, तिला कुत्र्याची विष्ठा खाऊ घालून, खांबाला बांधून, धिंड काढण्यात आली होती. याबाबत पोलिसांनी आरोपी बाबु जामुनकर, सयबु शतुर, सयबु शतुरची पत्नी, साबुलाल चतुर, रामजी चतुर यांच्याविरोधात गुन्हे दाखल केले होते. परंतु, ३० डिसेंबर रोजी याबाबत वृध्देने तक्रार दिल्यानंतर डयूटी ऑफीसर असलेले दिपक सोनाळेकर यांनी आरोपी पोलिस पाटील बाबु जामुनकर यांच्यासह मिळून धिंडचा मुद्दा वगळून गंभीर दुखापतीचा गुन्हा दाखल केला होता. वृध्देने एससींपींची भेट घेतल्यानंतर याबाबत चौकशीमध्ये दिपक सोनाळेकरसह चिखलदराचे ठाणेदार आनंद पिदुरकर व अन्य काही दोषी आढळल्याने आयजी रामनाथ पोकळेंनी सर्वांना निलंबित केले होते.

## आमदार चषक राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेचा शानदार शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती –** अमरावती शहरातील क्रीडा सेवांचा विस्तार व चांगल्या दर्जाच्या क्रीडा सुविधा गत काही वर्षात निर्माण झाल्याने शहराचा क्रीडा लौकिक वाढला आहे. शहरात क्रीडा शिक्षण, प्रशिक्षण, सराव व विविध स्तरावरील स्पर्धा आयोजनाची सुविधा उपलब्ध झाल्याने अमरावती शहर क्रीडा नगरी म्हणून नावारूपास आल्याचे प्रतिपादन अमरावतीच्या आमदार सुलभाताई खोडके यांनी केले.



स्थानिक सायन्सकोर मैदान येथे इंडिपेन्डन्ट ॲक्डमीतर्फे (फुटबॉल) आयोजित आमदार चषक राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेचा शानदार शुभारंभ बुधवारी करण्यात आला. त्याप्रसंगी उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव अविनाश असनारे अध्यक्षस्थानी तर प्रमुख अतिथी म्हणून शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश खोडके, महाराष्ट्र श्री छत्रपती पुरस्कारप्राप्त प्रा. डॉ. हनुमंत लुंगे, डॉ. राजेंद्र रामटेके, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, इंडिपेन्डन्ट ॲक्डमी (फुटबॉल) अमरावतीचे अध्यक्ष बाळासाहेब सोलीव, उपाध्यक्ष बब्बू लालूवाले, सचिव दिनेश म्हाला आदी उपस्थित होते.

खेळातून करिअर बनविण्यावर लक्ष केंद्रित करा: सुलभाताई खोडके खेळाडूंचा परिचय करून घेताना आ. सुलभाताई खोडके व अविनाश असनारे.पाच दिवसापर्यंत या स्पर्धेत फुटबॉलचा थरार रंगणार आहे. खेळ हे राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक सद्भावनेचे प्रतीक आहेत. छोट्या–छोट्या स्पर्धामधूनच मोठे खेळाडू उदयास येतात. त्यामुळे स्पर्धकांनी आपल्या क्रीडा–कौशल्याची चुणूक दाखवून केवळ विजेता होण्यासाठीच धडपड न करता खेळातून करियर बनविण्यावर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन आमदार सुलभाताई खोडके यांनी केले. आमदार चषक राज्यस्तरीय फुटबॉल स्पर्धेच्या पहिल्या दिवशी चार सामने खेळल्या गेले. ज्यामध्ये इंडिपेन्डन्ट ॲकेडमीअमरावती व स्पोर्ट क्लब अमरावतीमध्ये सामना खेळाला गेला. हा सामान १–१ गोलने ड्रॉ ठरला. तर दुसरा सामना वर्धा डीएफएविरुद्ध अमरावती फुटबॉल क्लबमध्ये खेळाला गेला. तोसुद्धा १–१ ने सामना अनिर्णयीत सुटला. तिसऱ्या सामना वाशीम डीएफए व युनायटेड फुटबॉल क्लब अमरावतीमध्ये खेळला गेला आणि १–१ ने बरोबरीने सुटला. तर चौथा सामना अन्जल फुटबॉल अकेडमी अमरावती विरुद्ध अकोला सरकार क्लबमध्य खेळाला गेला असता दोन गोल ने आघाडी मिळवा अॅन्जल फुटबॉल अकेडमीने विजय नोंदविला.

## आता शहर पोलिसांमध्ये 'गुन्हे शोध' स्पर्धा

### पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांची संकल्पना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती**

शहरातील सर्व पोलीस ठाणे स्वच्छ ठेवण्यासाठी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी बानी गतवर्षी 'स्वच्छ पोलीस ठाणे, सुंदर पोलीस ठाणे' ही स्पर्धा आयोजित केली होती. ज्यामुळे शहरातील सर्व पोलीस ठाणी स्वच्छ चकचकीत झालीत. त्या पाठोपाठ आता पोलीस आयुक्तांनी शहर गुन्हेगारीमुक्त ठेवण्यासाठी शहर पोलिसांच्या सर्व विशेष विभागांसह पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हे शोधण्यासाठी स्पर्धा सुरू केली आहे. गुन्हे शाखेच्या दोन्ही युनिट्स, सीआययू पथक आणि सर्व पोलिस ठाण्यांच्या डीबी पथकांसह विशेष पचके गुन्ह्यांचा उलगडा करण्यात तसेच गुन्हेगारांना अटक करण्यात गुंतलेली आहेत. ज्याचे परिणाम गेल्या काही दिवसांपासून दिसून येत आहेत. नवीन वर्षात गुन्हे शाखेचे युनिट आणि क्राईम इन्व्हेस्टीगेशन युनिटवेगवेगळे केल्याने एकामागून एक विविध गुन्हे उपड करण्यासोबतच, त्या गुन्ह्यांमध्ये सहभागी आरोपींना ही मोठ्या जोमाने पकडले जात आहे. शहर पोलिसांनी विशेषतः चोरी, घरफोडी आणि चेन स्नॅचिंगच्या घटनांवर लक्ष केंद्रित केले आहे. एक महिन्यापूर्वी पोलीस आयुक्त रेड्डी यांनी गुन्हे शाखेच्या दोन्ही युनिट्स, विशेष पथक आणि सीआययू पथक प्रमुख तसेच सर्व पोलिस स्टेशन प्रभारीची एक विशेष बैठक बोलावली होती. ज्यामध्ये त्यांनी सांगितले



होते की, कामावर पूर्ण लक्ष केंद्रित केले पाहिजे, प्रत्येक अधिकारी आणि कर्मचा–याने केलेल्या कामाचा आढावा घेतला जाईल शिवाय कोणताही अधिकारी आणि कर्मचारी एकाच ठिकाणी किंवा शाखेत जास्त काळ तैनात राहणार नाही, प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याला वेगवेगळ्या विभागात कर्तव्य बजावताना त्यांची उपयुक्तता सिद्ध करावी लागेल, असे सांगितले होते. तेव्हापासून गुन्हे शाखेच्या दोन्ही युनिटमध्ये गुन्हे शोधण्याबाबत एक प्रकारची स्पर्धा सुरू झाली. माजी नगरसेवक लबिना हर्ष यांच्या घरातून २० तोळे सोने चोरीच्या प्रकरणात आरोपींना अटक करण्यासोबतच चोरीचा मालही संपूर्णपणे जप्त करण्यात आला. चांगापूर येथील दोन घरांमधून सोने–चांदीच्या दागिन्यांसह सुमारे १४ लाख रुपयाच्या चोरीच्या प्रकरणात गुन्हा दाखल होण्यापूर्वीच एका आरोपीला अटक करण्यात आली. दुसरीकडे, चेन स्नॅचिंग प्रकरणात इराणी टोळीतील एका सदस्याला आणि त्याच्या स्थानिक सहका–याला अटक व सुमारे ८ लाख रुपयांचा माल जप्त करण्यात आला. या टोळीने केलेल्या २१ घटना उघडकीस आल्या आहेत. ही बेन स्नॅचिंगविरुद्धची एक मोठी कारवाई आहे. गुन्हे शाखेच्या दोन्ही युनिट्मची कामगिरी पाहून सर्व पोलिस ठाण्यांमध्ये गुन्हे शोधण्याबाबत स्पर्धा सुरू झाली आणि सर्व पोलिस ठाण्यांच्या डीबी पथकांनी कामाला सुरुवात केली आहे. बडनेरा पोलिसांनी जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला आणि दीड लाख रुपयांचा माल जप्त केला, तर गाडगेनगर पोलिसांनीही चोरी आणि घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपींना पकडले आणि त्यांच्याकडून बोरीचा माल जप्त केला. राजापेठ पोलिसांची कामगिरीही खूप चांगली राहिली.

## वाशिम जि.प.च्या शिक्षणाधिकाऱ्यांना नोटीस

### वादग्रस्त आदेशाला हायकोर्टात आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०वाशी–** ममुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने मुख्याध्यापक नियुक्तीच्या वादाची दखल घेऊन वाशिम जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांसह इतर संबंधित प्रतिवादींना नोटीस बजावली. तसेच सर्वांना येत्या ५ मार्चपर्यंत प्रतिज्ञापत्राद्वारे स्वतःची बाजू मांडण्याचे निर्देश दिले.

अनसिंग येथील स्यादवाद शिक्षण संस्थेद्वारे संचालित पी. डी. जैन विद्यालयामध्ये सहायक शिक्षिका स्वातीउनहोने यांची मुख्याध्यापकपदी नियुक्ती करण्याला शिक्षणाधिकाऱ्यांनी मान्यता दिली आहे. यासंदर्भात १ ऑक्टोबर २०२४ रोजी वादग्रस्त आदेश जारी करण्यात आला आहे. त्याविरुद्ध संस्थेने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व वृषाली जोशी यांच्यासमक्ष सुनावणी झाली.

दरम्यान, संस्थेचे वकील ॲड. स्वप्नील वानखेडे यांनी वादग्रस्त आदेश अवैध असल्याचा दावा केला. सेवाज्येष्ठता यादीनुसार सहायक शिक्षक राजेश मानकर हे उनहोने यांच्यापेक्षा ज्येष्ठ आहेत. त्यामुळे मानकर यांना मुख्याध्यापकपदी बढती द्यायला पाहिजे असे ॲड वानखडे यांनी सांगितले.

## 'मातोश्री'वर राऊत, सावंत, नार्वेकरांचा ताबा: उद्धव ठाकरे गटाच्या प्रवक्त्यांचा घराचा आहेर

### पक्षाकडून तडकाफडकी हकालपट्टी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०मुंबई–** विधानसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचा पक्षातील अनेक नेते आणि पदाधिकारी पक्षाला 'जय महाराष्ट्र' करत आहेत. यातच उद्धव ठाकरे गटाचे प्रवक्ते किशोर तिवारी यांनी पक्षाला घरचा आहेर देत मातोश्रीवर ताबा मिळवला असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर पक्षाच्या वतीने आता त्यांची तडकाफडकी हकालपट्टी करण्यात आली आहे. त्यामुळे ठाकरे गटातील घडामोडींकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

यासंबंधी उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे प्रवक्ते किशोर तिवारी यांनी पक्षातील नेत्यांवरच आरोप केले होते. एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना मातोश्री आणि सेना भवनावर शिवसेना नेते विनायक राऊत, अरविंद सावंत, संजय राऊत आणि मिलिंद नार्वेकर या सारख्या नेत्यांनी ताबा मिळवला असल्याचा आरोप त्यांनी केला होता. विधानसभा निवडणुकीमध्ये झालेल्या पराजयाची जबाबदारी निश्चित करून जनाधार असलेल्या नेत्यांना पक्ष सोडण्यासाठी लावणाऱ्या या नेत्यांची हकालपट्टी करा, अशी मागणी किशोर तिवारी यांनी केली होती. किशोर तिवारी यांनी दिलेल्या या घरच्या आहेरानंतर त्यांची तडकाफडकी पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. या संबंधात किशोर तिवारी यांनी देखील पक्षाच्या या निर्णयावर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

नागपूर जिल्ह्याचे किशोर तिवारी यांना प्रवक्ते पदावरून पदमुक्त केले

किशोर तिवारी हे हे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रवक्ते होते. त्यांना पदावरून पदमुक्त करण्यात आले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी नागपूर जिल्ह्याचे किशोर तिवारी यांना प्रवक्ते पदावरून पदमुक्त करण्यात आले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकाद्वारे कळवण्यात आले आहे.



चळवळीच्या कार्यकर्त्याला साधी सूचना न देता सरळ हकालपट्टी किती योग्य

हकालपट्टी केल्यानंतर किशोर तिवारी यांनी हे किती योग्य आहे? असा प्रश्न विचारला असून यासंबंधी ते म्हणाले की, 'उद्धव ठाकरेंना शिवसेना मध्ये विनायक राऊत अरविंद सावंत संजय राऊत मिलिंद नार्वेकर सारख्या नेत्यांनी मातोश्री व सेना भवनावर केलेल्या ताबा मिळवून, विधान सभा निवडणुकी मध्ये पराजय करण्यात जबाबदारी निश्चित न करीत जनाधार असलेल्या नेत्यांना पक्ष सोडण्यास लावणाऱ्या पोटभरू कावेबाज नेत्यांना हकालपट्टी करा ही मागणी शिवसेना प्रवक्ते किशोर तिवारी यांनी केल्यावर, मुलाखती नंतर तडका फडकी किशोर तिवारी यांची हकालपट्टी आज रात्री करण्यात आली आहे. जो माणूस सत्य बोलण्याचे धाडस करतो, उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी मागील पाच वर्षांपासून सतत राहून भाजपच्या सर्व प्रवक्त्या मंडळींनी त्यांची जागा दाखविणाऱ्या एका चळवळीच्या कार्यकर्त्याला साधी सूचना न देता सरळ हकालपट्टी किती योग्य आहे,

# पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप मध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती सोहळा उत्साहात साजरा

## ढोल पथक वाजवत विद्यार्थ्यांचा सहभाग





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती** – पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती येथे विद्यार्थ्यांच्या अंतर्नाद क्लब, सोशल मीडिया क्लब, आणि सांस्कृतिक क्लबच्या वतीने महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या जयंतीचा सोहळा अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रीय पोशाख परिधान करून ढोल पथक वाजवले, लेझीम खेळले, आणि पथनाट्य सादर केले. त्याचबरोबर, माँसाहेब जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, आणि मावळ्यांच्या भूमिकेतील विद्यार्थ्यांनी प्रभावी सादरीकरण केले.

छत्रपती शिवाजी महाराज यांची भव्य मिरवणूक महाविद्यालयाच्या परिसरात काढली, ज्यामुळे संपूर्ण परिसर भगवामय झाला. यानंतर अफजल खान वध नाटिका सादर करत महाराजांचा जयघोष करण्यात आला, आणि विद्यार्थ्यांनी महाराजांचा पोवाडा व लाठी काठी प्रयोग सादर केले.

प्रसिद्ध व्याख्याते श्री. सनी रबडे यांचे प्रेरणादायी व्याख्यान विद्यार्थ्यांच्या मनामध्ये नव चैतन्य व उत्साह निर्माण करणारे ठरले.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रविण पोटे पाटील व उपाध्यक्ष श्री. श्रेयसदादा पोटे पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करून फुलांचा हार अर्पण केला व महाआरती केली.

संस्थेचे उपाध्यक्ष श्री. श्रेयसदादा पोटे पाटील यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आदर्श घेऊन आपल्यात सर्वोच्च स्थान प्राप्त करण्याची प्रेरणा दिली.कार्यक्रमास प्राचार्य, उपप्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या वतीने या सोहळ्याचे आयोजन अत्यंत यशस्वीपणे करण्यात आले.–

# मराठा सेवा संघातर्फे शिव मॅरेथॉन स्पर्धा

## अभिषेक वेळूकर,आर्या झाडे,रोहित खंडारे ठरले क्रमांकाचे मानकरी

### २३ फेब्रुवारीला ॲड.प्रविण देशमुख यांचे व्याख्यान,किल्ले सजावट व वेशभूषा स्पर्धा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०धामणगाव रेल्वे** ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड तथा राष्ट्रमाता जिजाऊ कर्मचारी सहकारी पतसंस्था, धामणगाव रेल्वे यांच्या संयुक्त विद्यमाने शिव मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन तीन गटांमध्ये बुधवारला (ता.१९) आयोजित करण्यात आली होती .यामध्ये तानाजी गटात अभिषेक वेळूकर,हिरकणी गटातून आर्या झाडे,संभाजी गटातून रोहित खंडारे हे प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले.

मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड तथा राष्ट्रमाता जिजाऊ कर्मचारी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शिव मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून छत्रपती शिवाजी महाराज चौकातून दत्तापुरचे ठाणेदार गिरीश ताथोड यांच्या हस्ते शिव मॅरेथॉन स्पर्धेची सुरुवात झाली. सदर स्पर्धा १८ वर्षे खालील मुलांचा तानाजी गट,१४ वर्षावरील मुलींचा हिरकणी गट तर १८ वर्षावरील व्यक्तींसाठी संभाजी गट अशा तीन गटात घेण्यात आली.या शिव मॅरेथॉन स्पर्धेत तानाजी गटातून अभिषेक वेळूकर प्रथम,यश दोड द्वितीय तर आर्यन सलामे यांने तृतीय क्रमांक पटकावला.हिरकणी गटातून आर्या झाडे प्रथम, कीर्ती बोरकुटे द्वितीय तर अंकिता कावळे हिने तृतीय क्रमांक पटकावला.तसेच संभाजी गटातून रोहित खंडारे याने प्रथम तेजस भगत द्वितीय तर तेजस ताडाम यांने तृतीय क्रमांक पटकावला.

### २३ फेब्रुवारीला ड.प्रविण देशमुख यांचे व्याख्यान,किल्ले सजावट व वेशभूषा स्पर्धा

२३ फेब्रुवारीला येथील स्व. दादारावजी अडसड व्हालीबॉल मैदानात महाराष्ट्रातील सुप्रसिध्द् वक्ते ड.प्रविण देशमुख यांचे 'छत्रपती शिवरायांच्या शिवशाहीचा आदर्श वर्तमान लोकशाहीचा परामर्ष' या विषयावर व्याख्यान होणार आहे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी मराठा सेवा संघाचे अध्यक्ष सुनिल रोंघे हे राहतील.तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रमाता जिजाऊ कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रा. विलास जाधव हे राहतील.तसेच किल्ले सजावट स्पर्धा तर वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या शिव मॅरेथॉन स्पर्धेच्या वेळी मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड,जिजाऊ ब्रिगेड तथा राष्ट्रमाता जिजाऊ कर्मचारी सहकारी पतसंस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.अशी माहिती मराठा सेवा संघाचे अध्यक्ष सुनिल रोंघे यांनी दिली.

# मेळघाटातील पाणवठ्यावर पाणी पिताना वाघाचे सहकुटुंब दर्शन!

## मचाणाखालून अचानक आले तीन बछडे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०मेळघाट** – मेळघाट व्याघ्र प्रकल्पातर्फे १३ ते१६ फेब्रुवारीदरम्यान तिसरे पक्षी सर्वेक्षण पार पडले. एरवी मेळघाटाच्या राखीव जंगलात जाण्यास बंदी असली तरी पक्षी सर्वेक्षणादरम्यान वनकर्मचाऱ्यांसोबत तिथे दाखल झालेल्या पक्षिनिरीक्षकांना वाघाचे अख्खे कुटुंब दिसले. पक्षिनिरीक्षक किरण मोरे, मनीष ढाकूलकर, प्रशांत तिरमारे यांना तीन बछड्यांसह वाघाच्या जोडप्याचे दर्शन झाले.१६ फेब्रुवारीच्या दुपारी पक्षिनिरीक्षक किरण मोरे वनसंरक्षकासोबत पक्षिनिरीक्षणासाठी निघाले. यादरम्यान एका बशीच्या आकाराच्या पाणवठ्याजवळ एक जुने मचाण होते. थकल्यामुळे पुढचे पक्षिनिरीक्षण मचाणावर बसून करण्याचे मोरे यांनी ठरविले. त्यामुळे सहकारी पुढे निघून गेले. काही वेळाने माकडांचा अलर्ट कॉल आला. पाठोपाठ भेडकी ओरडली. यानंतर एक वाघीण सावकाशपणे पाणवठ्यावर आली व पाणी पिऊ लागली. काही क्षणांतच मचाणाखालून तीन बछडे एकत्रित पाणवठ्याकडे जात असल्याचे त्यांना दिसले.जवळपास दहा मिनिटांनी एक मोठ्या आकाराचा वाघ पायवाटेवरून मचाणाजवळ आला आणि पाणवठ्याकडे न जाता परत फिरला.पक्षिनिरीक्षणाकरिता गेलेले त्यांचे मित्र व वनरक्षक यांनीही है पाच वाघांचे कुटुंब न्याहाळले.

# दुचाकी विकायला आला अन् पोलिसांच्या जाळ्यात अडकला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती–** सराईत दुचाकी चोरटा चोरीची दुचाकी विकायला आला अन् पोलिसांच्या जाळ्यात अडकला. त्याच्याकडून पोलिसांनी चोरीच्या ५ दुचाकी असा एकूण २ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. विशाल चरणदास जाधव (वय २१ रा. बोडना, तपवनेश्वर) असे अटकेतील चोरट्याचे नाव आहे.गाडगेनगर पोलीस बुधवारी दुपारी तपोवन परिसरात गस्तीवर असताना एक युवक दुचाकी विक्री करीता ग्राहक शोधत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तेव्हा लगेच पोलीस घटनास्थळी पोहचले आणि विशाल जाधवला ताब्यात घेऊन त्याच्या जवळील दुचाकी क्र. एम.एच. २७ ई.एक्स. ०२११ बाबत विचारपुस केली आणि कागदपत्रे मागितली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे पोलिसांनी दुचाकीसह त्याला तब्यात घेतले आणि ठाण्यात आणून कसुन चौकशी केली असता शहरातून पाच दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. तेव्हा पोलिसांनी पाच दुचाकी जप्त करून विशाल जाधवला अटक केली. या कारवाईत ठाणेदार ब्रम्हा गिरी, दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात सपोनि मनोजकुमार मानकर, मनिष सावरकर, संजय भेलावे, निलेश जुनघरे, गजानन बरडे, सुशांत प्रधान, सागर धरमकर, मतीन शेख आणि सिध्दार्थ श्रृंगारे यांचा समावेश होता.

# हरभरा काढताना थ्रेशरमध्ये पाय अडकून शेतमजुराचा मृत्यू


### बेंबळा खुर्द येथील घटना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०बेंबळा** खुर्द– दर्यापूर शेतातील हरभऱ्याच्या गंजीला थ्रेशरमधून काढत असताना अचानक पाय घसरून शेतमजुराचा थ्रेशरमध्ये अडकून मृत्यू झाला. ही घटना खल्लार जवळील बेंबळा खुर्द शेत शिवारात बुधवारी (ता. १९) सकाळी ११ वाजता घडली.अमोल अनिल डिके (वय ३७, रा. खल्लार), असे मृताचे नाव आहे. बुधवारी सकाळी ११ वाजताच्या सुमारास बेंबळा खुर्दमध्ये अनिल कळंके यांच्या शेतात हरबरा काढणे सुरु होते. अमोल हा हरभऱ्याच्या गंजीवर चढून थ्रेशरमध्ये हरभरा टाकत होता. हरभऱ्याची गंजी उंच असल्याने अचानक त्याचा पाय घसरून तो थ्रेशरमध्ये पडला. चालू थ्रेशरमध्ये अमोलचा डावा पाय थ्रेशरच्या पट्ट्यात अडकून थ्रेशरमध्ये गेला. त्याच्या पायाचे अक्षरशः हजारो तुकडे झाले. तेथीलउपस्थित मजुरांनी त्याला रक्तबंबाळ अवस्थेत दवाखान्यात नेण्याचा प्रयत्न केला व रुग्णालयात तातडीने सूचना देऊन ॲम्बुलन्स गाडी बोलावली. त्याची स्थिती अत्यंत नाजूक असल्याने त्याला तातडीने अमरावती येथील रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र वाटेतच त्याचा मृत्यू झाला. संबंधित थ्रेशर अब्दुल वाहेद (रा. खल्लार) यांचे असून अमोल डिके हा थ्रेशरवर अन्य दोघांसह मजुरी करत होता. अमोल डिके याच्या मृतदेहाचे दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय परिक्षण करण्यात आले. जिल्हा परिषद् सदस्य तथा शिवसेना नेते सुनील डिके तथा आप्तस्वकीय व गावकरी यावेळी उपस्थित होते. अमोल डिके यास तीन वर्षाचा मुलगा, एक भाऊ, आई–वडील व पत्नी असा परिवार आहे. अमोल डिके यांची आर्थिकस्थिती बेताची असून या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.–

# तळवेल येथे श्री.संत गजानन महाराज मंदिरात प्रगटदिन सोहळा

## आज महाप्रसाद, तीन दिवसांत विविध कार्यक्रम



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०टाकरखेडा संभू** नजिकच्या तळवेल येथे श्री.संत गजानन महाराज मंदिरात प्रगटदिन सोहळा आयोजित करण्यात आला असून गूरूवारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तीन दिवशीय सोहळ्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.याअंतर्गत बुधवारी सकाळी ५ वाजता श्रींचा सामूहिक अभिषेक व तीर्थस्थापना करण्यात आली.

सकाळी ७ वाजता दैनंदिन आरती व श्री संत गजानन महाराज विजय ग्रंथाचे पारायण पार पडले. गूरूवारी पहाटे ४ वाजता श्रीं चा अभिषेक व आरतीनंतर सकाळी १० वाजता भोग नैवेद्य दुपारी १२ वाजता होम, सायंकाळी ७ वाजता आरती नंतर लगेच महाप्रासादाचे आयोजन करण्यात आले आहे.तिसऱ्या दिवशी शुक्रवारी सकाळी ११ वाजता श्री संत गजानन महाराज भक्त परिवाराच्या वतीने भजनी काला होईल.

या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# आशादीप फाउंडेशनतर्फे भव्य हळदी-कुंकू सोहळ्याचे आयोजन

## ५०१ महिलांचा उत्स्फूर्त सहभाग!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती:** आशादीप फाउंडेशन तर्फे स्वामी विवेकानंद थीम पार्क, कठोरा नाका येथे पारंपरिक हळदी–कुंकू सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला ५०० महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला, विविध खेळ, मनोरंजनाच्या कार्यक्रमांमध्ये आनंद घेतला आणि आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी मिळवली.

कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्य अतिथी किरणताई महल्ले यांच्या हस्ते झाले. तसेच, वंजारी काकू,भदे काकू गिरासे काकू, वैद्य काकू यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या विशेष सोहळ्याचे आयोजन आशादीप फाउंडेशनच्या अध्यक्षा आशा दिलीप दरणे आणि उपाध्यक्ष आनंद दिलीप दरणे यांनी केले होते.या कार्यक्रमात सहभागी महिलांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्यांना फॅन, गीझर, कूलर, मिक्सर, ब्लेंडर, इस्त्री आणि इतर आकर्षक बक्षिसे देण्यात आली.

पारंपरिक हळदी–कुंकूच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये एकात्मता, स्नेहभाव आणि सामाजिक बांधिलकी वृद्धिंगत करण्याचा उद्देश सफल झाल्याचे आयोजकांनी सांगितले.महिलांनी या सोहळ्यात मोठ्या उत्साहाने भाग घेतला आणि संपूर्ण कार्यक्रम आनंद, उत्साह आणि उत्सवमूर्ती वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सहभागी महिलांनी आणि मान्यवरांनी आशादीप फाउंडेशनचे विशेष कौतुक केले.



# तापमानात वाढीमुळे सिंचन प्रकल्पांतील जलसाठा घटला

## आठवडाभरातच जलसाठ्यात घट : ५६ प्रकल्पांत ६०.९५ टक्के जलसाठा शिल्लक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

गतवर्षी जिल्ह्यात झालेल्या संततधार तसेच प्रकल्प क्षेत्रातील पावसामुळे अप्पर वर्धा या मोठ्या मोठा प्रकल्पासह ७मध्यम आणि ४८ लघु अशा ५६ प्रकल्पातील जलसाठ्यात वाढ झाली. यातील बरेच प्रकल्प ओव्हरफ्लोही झाले. मात्र, आता उन्हाळा सूरू झाल्याने तापमानात देखील वाढ होत आहे. अशातच जिल्ह्यातील ५६ प्रकल्पांचा जलसाठा कमी होत चालला आहे. अलीकडेपाण्याचा अधिक वापर आणि वाढत्या तापणामुळे होत असलेल्या बाष्पीभवनामुळे आठवडाभरातच ३ टक्के जलसाठा घटला आहे. त्यामुळे आगामी काळात आणखी मोठ्या प्रमाणात जलसाठ्यात घट होण्याची शक्यता आहे.जिल्ह्यात मागील वर्षी समाधानकारक पाऊस झाला आहे. याशिवाय सततधार पावसामुळे जिल्ह्यातील प्रकल्पांचा पाणीसाठ्यात वाढ झाली. त्यामुळे त्या काळात पिण्याला तसेच शेतीला देखील पूरक पाणी मिळाले. तसेच ऑगस्ट ते सप्टेंबर या कालावधीत पावसाने रिपरिपसह दमदार हजेरी लावली होती. सप्टेंबर अखेरपर्यंत पावसाचा जोर कायम होता. याच काळात अवकाळी पावसाचा जोरही बघायला मिळाला. त्यामुळे जलपातळीत आणखी वाढ झाली. त्यामुळे नदी नाल्यांसह मोठे प्रकल्प आणि मध्यम प्रकल्पांच्या जल पातळी वाढली आहे. मात्र, उन्हाळ्याच्या दिवसात पाण्याचे पाणी, सिंचन, औद्योगिक वसाहतीसाठी पाण्याची मागणी वाढते. तसेच पाण्याचे बाष्पीभवनही होते. त्यामुळे पाण्याची पातळी खाली जाते. आठवड्यात ६३ टक्के जलसाठा असताना सद्यास्थितीत ५६ प्रकल्पांत उपयुक्त जलसाठा हा ६०.९५ टक्के आहे. आठवडाभरात ३ टक्के साठा घटला आहे. जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या अप्पर वर्धा धरणाचा पाणीसाठा हा ६४.३६ टक्के आहे. ७मध्यम प्रकल्पात ५७.१९ टक्के पाणीसाठा तर ४८ लघु प्रकल्पात ५६.६९ टक्क्यांवर जलसाठा आहे. यातील अनेक लघु प्रकल्प आटले असून मध्यम प्रकल्पातील पाण्याची पातळी कमी झाल्याचे चित्र आहे.

**प्रकल्पांमधील जलसाठा**

| प्रकल्प | टक्के |
|---|---|
| अप्पर वर्धा | ६४.३६ |
| शहानूर | ७१.७२ |
| चंद्रभागा | ८३.२७ |
| पूर्णा | ७६.७६ |
| सपन | ८९.४८ |
| पंढरी | ३६.२० |
| बोर्डी नाला | २२.३६ |
| गर्गा | ००.०० |
| ४८ लघु | ५६.६९ |

## नागपुरात गुढीपाडव्याला मोदी, भागवत एकाच व्यासपीठावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

गुढीपाडव्याच्या दिवशी ३० मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत नागपुरात एका व्यासपीठावर एकत्र येण्याची शक्यता आहे.

माधव नेत्रालयाच्या नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा यावेळी होणार आहे. माधव नेत्रालय आय इन्स्टिट्यूट आणि रिसर्च सेंटर हे संघाशी संबंधित आहे. माधव नेत्रालयाची नवीन इमारत हिंगणा रोडवरील वासुदेवनगर मेट्रो स्टेशनजवळ ६.८ एकर परिसरात प्रस्तावित आहे. गुढीपाडव्याला सकाळी १० वाजता संस्थेतर्फे नवीन इमारतीचा पायाभरणी समारंभ होणार आहे.

## श्रीकृष्ण - रुख्मिणी विवाह.......



श्यामनगर स्थित असलेल्या संत गजानन महाराज मंदिरामध्ये प्रगट दिनाच्या निमित्याने भागवत कथेच आयोजन करण्यात आले आहे या भागवत कथेमध्ये बुधवारी भगवान श्रीकृष्ण - रुख्मिणी विवाहाचे आयोजन करण्यात आले होते. या भागवत कथेचा अनेक श्रोते लाभ घेत आहे.

# सहा दिवसांत केवळ ९९ प्रवेश निश्चित

## प्रवेशाकरिता आठ दिवस शिल्लक २,३९६ पाल्यांना प्रवेशाचा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

आरटीई प्रवेश प्रक्रियेत सहा दिवसांत केवळ ९९ प्रवेश निश्चित झाले आहेत. प्रवेशाकरिता आठ दिवस शिल्लक राहीले असून या दरम्यान संदेश प्राप्त झालेल्या २,३९६ पाल्यांचे प्रवेश निश्चित करावयाचा आहे.

२०२५-२६ या शैक्षणिक वर्षांकरिता आरटीई प्रवेशाला शुक्रवार, १४ फेब्रुवारीपासून सुरूवात करण्यात आली. २८ फेब्रुवारीपर्यंत सदरचे प्रवेश स्विकारले जाणार आहे. यापुर्वी तालुकास्तरीय समितीकडून कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. त्यांच्या शिफारशीनंतरच संबधित शाळांमध्ये पाल्यांचे प्रवेश निश्चित केले जाणार आहे.

जिल्ह्यात २२५ शाळांमध्ये २ हजार ४३० जागांकरिता आरटीईअंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. जिल्ह्यात १४ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान ८ हजार १४९ प्रवेश अर्ज प्राप्त झाले. या अर्जावर सोमवार, १० फेब्रुवारीला लॉटरी काढण्यात आली. अशा पहील्या टप्प्यात २ हजार ३९६ विद्यार्थ्यांची यादी घोषित करण्यात आली आहे. या पालकांना त्यांच्या मोबाईलवर प्रवेश निश्चित करण्याबाबत संदेश झाल्याने आता पडताळणी समितीकडे कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. या सहा दिवसांत २,३९६ पैकी केवळ ९९ पाल्यांचेच प्रवेश निश्चित झाले आहेत. बहुतांश अर्ज पडताळणी समितीकडे प्रलंबित असून अन्य पालकांनी मात्र अद्यापही समितीडे कागदपत्रांची पडताळणी सुरू केली नाही. त्यामुळे संबधित पालकांनी त्वरीत समितीकडून पाल्यांचा प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

# तूर खरेदी खोळंबली; दर हमीभावापेक्षा कमीच

## अधिकृत पोर्टलच सुरू नाही : खरेदी सुरू होण्याची शेतकऱ्यांना प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

केंद्र व राज्य सरकारच्या 'नाफेड' तसेच पणन महासंघाकडून २४ जानेवारीपासून तूर खरेदीसाठी शेतकरी नोंदणीचे आवाहन करण्यात आले होते, परंतु, अधिकृत वेबसाईट पोर्टलच सुरू नसल्याने तूर खरेदीसाठी नोंदणी खोळंबली आहे. त्यामुळे हमीभाव खरेदी केंद्रांवरील नोंदणी आणि खरेदी सुरू होण्याची शेतकऱ्यांना प्रतीक्षा आहे.



डिसेंबर-जानेवारी दरम्यान थंडीचा कडाका वाढताच शेतकऱ्याच्या घरात तुरीचे उत्पादन येण्यास सुरुवात झाली होती. नव्या वर्षात तुरीचे पीक जोमदार येणार म्हणून शेतकरी वगांत उत्साहाचे वातावरण होते. जानेवारीदरम्यान हमीभाव खरेदी केंद्रांवर ७ हजार ५५० रुपये दराने तूर खरेदीसाठी जाहीर करीत शेतकऱ्यांना नोंदणीचे आवाहनदेखील करण्यात आले. जिल्ह्यात शेतकऱ्यांनी तूर उत्पादन हाती येताच बाजार समितीत विक्रीसाठी आणण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे बाजारात पडत्या दराने कमी प्रतिचा माल म्हणून शेतकऱ्यांकडील तूर खरेदीहोत असल्याचे चित्र आहे. अमरावती बाजार समितीत मंगळवारी १० हजार ३७१ क्विंटलतुरीची आवक झाली. किमान ७हजार तर कमाल ७ हजार ५०० म्हणजे सरासरी ७ हजार २५० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. बाजारात गेल्या दीड महिन्यात १ लाख ३० हजार क्विंटल तुरीची आवक झाली आहे. सरासरी ७ हजार २०० रुपये दर मिळाला असून हमीदराच्या तुलनेत प्रतिक्विंटल अडीचशे रुपये कमी मिळत आहेत.कोरडवाहू पट्टधात कापूस, सोयाबीन व तूर ही खरीप हंगामातील मुख्य पिके आहेत. यंदा तीनही पिकांचे बाजारमूल्य कमालीचे घसरले आहे. राज्य सरकारने सोयाबीनची शासकीय खरेदी केली. मात्र, उद्दिष्टापेक्षा निम्मे सोयाबीनच खरेदी होऊ शकले. कापसाची खरेदी सीसीआयमार्फत करण्यात येत असली, तरी गेल्या एक आठवड्यापासून तांत्रिक कारण देत ती रखडली आहे. आता तुरीची शासकीय खरेदी करण्यात येणार आहे. १३ फेब्रुवारीपासून खरेदी प्रारंभ करण्याचे आदेश आहेत. मात्र, खरेदी अद्यापपर्यंत सुरू झालेली नाही. जिल्ह्यात वीस केंद्रांवर खरेदी करण्यात येणार आहे. या केंद्रांना खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. बाजारात तूर येताच बाजार समित्यांमध्ये तुरीचे बाजारभाव तब्बल हजार रुपयांनी खाली आले आहेत. तर नाफेड तथा पणन महासंघांतर्गत शासकीय हमीभाव केंद्रांमध्ये खरेदी अद्यापही सुरू झालेली नाही. जिल्ह्यात ३९ हजार ६५४ टन खरेदीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. यंदाच्या हंगामात १ लाख ११ हजार हेक्टर क्षेत्रात तुरीची पेरणी झाली आहे. कृषी विभागाने जिल्ह्याची सरासरी उत्पादकता १ हजार ३६० किलो प्रतिहेक्टर काढली असून यंदा १ लाख ५८ हजार ६९६ टन उत्पादनाचा अंदाज व्यक्त केला आहे. या उत्पादकतेवर आधारित पंचवीस टक्के तूर खरेदी करण्यात येणार आहे.

# जुना धामणगाव जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी मेट्रोच्या प्रवासाचा लुटला आनंद

## पीएम श्री शाळा अंतर्गत शैक्षणिक सहल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०धामणगाव रेल्वे**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक सहली खूप महत्त्वाच्या असतात. त्यामुळे त्यांना स्वतःहून शिकण्याची संधी मिळते.विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाशी संबंधित गोष्टींशी परिचित करून देण्यासाठी सहलींचे आयोजन करते.दरम्यान तालुक्यातील जुना धामणगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी नागपूर शहरातील रामण सायन्स सेंटर,मेट्रो स्टेशन,दिक्षाभूमी व आदी स्थळांना भेटी दिल्या.मेट्रोची तिकिट घेऊन स्कॅन करणे,ॲक्सिलेटर चा उपयोग करून मेट्रोच्या प्रवासाचा मनमुराद प्रत्यक्ष आनंद व अनुभव घेतला.



पीएम श्री शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहली आयोजित केल्या जातात. या सहलींमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासांशी संबंधित गोष्टींची ओळख होते. याशिवाय, त्यांना व्यावहारिक कौशल्ये विकसित करण्याची, आत्मविश्वास निर्माण करण्याची आणि चिरस्थायी आठवणी निर्माण करण्याची संधी मिळते.विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासांना वास्तविक-जागतिक अनुप्रयोगांशी जोडण्यात मदत करणे.विद्यार्थ्यांना स्वतःहून शिकण्याची संधी देणे आवश्यक आहे.त्यानुसार तालुक्यातील जुना धामणगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहलीचे आयोजित करण्यात आली होती.नागपूर येथील रामण सायन्स सेंटर मधे विद्यार्थ्यांनी पृथ्वी वरील जिवसृष्टीची निर्मिती,सूर्य मालेतील विविध ग्रहाची माहीती आदी प्रत्यक्ष अनुभव घेतला.महाराजा बागेत वाघ,अस्वलासारख्या प्राण्यांचे जवळून निरिक्षण केले.मेट्रो स्टेशनची माहीती घेतली.मेट्रोची तिकिट घेऊन स्कॅन करणे,ॲक्सिलेटर चा उपयोग करून मेट्रोच्या प्रवासाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.दिक्षाभूमीचे प्रत्यक्ष निरिक्षण करून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जिवनवृतांत जाणून घेतला.परत येताना विद्यार्थ्यांनी जेवणाचा पण अनुभव घेतला.सहलीत विद्यार्थ्यांसह शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा रेखा आमले,शिक्षक ज्योती बकाले,सविता सुपटकर,संगीता चौधरी,जयश्री शिमरे,अर्चना क्षीरसागर,शेषराव चव्हाण प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेच्या संगीता चौधरी आदी सहभागी झाले होते.

**शिक्षकांचा शैक्षणिक दौरा**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अमरावती च्या सौजण्याने अमरावती जिल्ह्यातील पी.एम.श्री.स्कूल अभियानात सहभागी असणा-या शाळेतील मुख्याध्यापक आणि विज्ञान शिक्षकांचा शैक्षणिक दौरा मध्यप्रदेशातील भोपाळ येथे आयोजित केला होता. यामधे जुना धामणगाव येथील विज्ञान शिक्षिका ज्योती बकाले,सविता सुपटकर सहभागी झाल्या होत्या.

# फुलआमला येथे प्रगट दिन साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील फुल आमला येथील युवा उदयोजक अमोल चवणे यांच्या शेतात संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.चवणे परिवार संचालित संत गजानन महाराज मंदिरातील श्रींच्या आकर्षक मूर्तीचे दर्शन घेण्यासाठी पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. महादेवराव चवणे,सौ. सुहासिनी चवणे, अमोल चवणे,सौ. रोहिणी चवणे, धनंजय कानफाडे,सारिका कानफाडे, प्रीती कट्यारमल यांच्या हस्ते श्रींच्या मूर्तीचा अभिषेक करून पूजन करण्यात आले.प्रकट दिनाच्या पूर्वसंध्येला गावातून श्रींची शोभायात्रा काढण्यात आली.शोभायात्रेचे विविध ठिकाणी स्वागत करण्यात आले. यावेळी परिसरातील नागरिकांनी आपल्या घरासमोर रांगोळी काढून परिसर सुशोभीत केला होता.शोभा यात्रेत मदन महाराज भजन मंडळ, श्री हनुमान ढोलाचे भजन मंडळ,रुख्मिनी महिला भजन मंडळ, यांनी वातावरण निर्मिती केली. गण गण गणात बोतेच्या गजरात शोभायात्रेचा समारोप झाला. यानंतर शेकडो गावकऱ्यांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चवणे परिवारातील सदस्यांनी व गावकऱ्यांनी परिश्रम घेतले.



# अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयातील परिचारिकांचे काम बंद आंदोलन; शासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

प्रलंबित पदोन्नती आणि अन्य मागण्यांकडे सरकार दुर्लक्ष करत असल्याच्या निषेधार्थ आज २० फेब्रुवारी २०२५ रोजी महाराष्ट्र गव्हर्मेंट नर्सेस असोसिएशन, जिल्हा शाखा - अमरावती यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात एक दिवसाचे काम बंद आंदोलन केले. यावेळी रुग्णालय परिसरात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. पदोन्नती प्रक्रिया त्वरित राबवावी, परिचर्या भत्ता व इतर भत्त्यांमध्ये वाढ करावी, ग्रामीण रुग्णालय परिसेविका पद पुनर्जीवित करावे, बंधपत्रित परिचारिकांचा सेवा कालावधी नियमित करावा, बक्षी समिती खंड-२ मध्ये परिचर्या संवर्गावरील अन्याय दूर करावा, अधिपरिचारिका पदासाठी परिविक्षा परीक्षा रद्द करावी आदी मागण्या करण्यात आल्या. परिचारिकांनी यापूर्वी शासनाकडे अनेकदा मागण्यांसाठी पत्रव्यवहार केला होता. तसेच, मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवसांच्या कार्यक्रमात सर्व शासकीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत तत्काळ निर्णय घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, अद्यापही परिचारिका संवर्गातील पदोन्नती रखडल्याने मोठा असंतोष पसरला आहे. या काम बंद आंदोलनामुळे जिल्हा सामान्य रुग्णालयातील रुग्णसेवा विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अनेक रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक संभ्रमात दिसून आले. काही अत्यावश्यक सेवा सुरू ठेवल्या असल्या तरी परिचारिकांच्या अनुपस्थितीमुळे रुग्णांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिचारिकांच्या संघटनेने इशारा दिला आहे की, जर सरकारने तातडीने योग्य निर्णय घेतला नाही, तर बेमुदत संप पुकारला जाईल. त्यामुळे प्रशासनाने त्वरित चर्चा घडवून आणावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.



# शेगावात आज श्रींचा प्रकट दिन ८४० भजनी दिंड्या दाखल

## मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई, भाविकांची गर्दी लक्षात घेऊन प्रवेश मार्ग एकेरी करण्याचा निर्णय





**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०शेगाव**

चला शेगावासी जाऊ, गजानन देवा पाहू, डोळे निवतील कान, मना तेथे समाधान, संता महंता होतील भेटी, आनंदे नाचे संतनगरी, हे भक्तांचे माहेर सर्व सुखाचे भांडार असलेल्या संतनगरी शेगावात संतनगरीचे आराध्य दैवत श्री संत गजानन महाराजांचा १४७ वा प्रकट दिन सोहळा माघ कृ. ७ गुरुवार २० फेब्रुवारी रोजी भक्तिमय वातावरणात होत आहे. या सोहळ्यासाठी शेगाव नगरी सज्ज झाली आहे. राज्यभरातून श्रींच्या प्रगट दिन उत्सवासाठी आज बुधवार १९ फेब्रुवारीच्या संध्याकाळपर्यंत ८४० च्या वर भजनी दिंड्या दाखल झाल्या होत्या व भजनी दिंड्या येण्याचा ओघ शेगावात सुरूच आहे.

योगीराज संत श्री गजानन महाराज यांचा १४७ वा प्रगट दिन उत्सव सोहळा गुरुवार १३ फेब्रुवारी रोजी सकाळी अकरा वाजता श्री महारुद्र स्वाहाकार यागाचे पूजन करून श्रींचा प्रगट दिन उत्सवाला प्रारंभ झाला. दरम्यान, भक्तिमय व मंगलमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमा नुसार गुरुवार २० फेब्रुवारी रोजी श्रींचा प्रगट दिन उत्सव पार पडणार आहे. त्या अनुषंगाने श्रींच्या मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यामध्ये दररोज मंदिरात काकडा ,भजन, दुपारी प्रवचन, सायंकाळी हरिपाठ व रात्री महाराष्ट्रातील नामवंत महाराजांचे कीर्तन आदी विविध धार्मिक कार्यक्रम पार पडत आहेत. उद्या गुरुवार २० फेब्रुवारी रोजी श्रींच्या प्रगट दिनी सकाळी १० वाजता यज्ञ यागाची पूर्णाहुती व अवभृतस्नान होईल. त्यानंतर सकाळी १० ते १२ या दरम्यान भरत बुवा पाटील म्हैसवाडी यांचे शेगावी श्रींच्या प्रगट दिनानिमित्त कीर्तन होईल. त्या नंतर दुपारी ४ वाजता श्रींच्या प्रगट दिन उत्सवानिमित्त श्रींची पालखी अश्व, रथ, मेण्यासह, परिक्रमेसाठी श्रींच्या मंदिरातून मार्गस्थ होईल.

राज्याच्या विविध भागांतून काही दिवसांपूर्वी निघालेल्या भजन दिंड्या शेगाव शहरात १९ रोजी दाखल होणे सुरू झाले. त्यांची योग्य ती व्यवस्था करण्यात येत आहे. काही दिंड्या २० रोजी दाखल होणार आहेत.

**श्रींच्या पालखीची आज दुपारी चार वाजता निघणार परिक्रमा**

श्री प्रगटदिन उत्सवानिमित्त २० फेब्रुवारी रोजी श्रींची पालखी परिक्रमा अश्व व भजनी दिंडीसह दुपारी ४ वाजता श्री मंदिर परिसरातून निघेल. श्री पालखी परिक्रमा मंदिर परिसरातील सेवाधारी प्रसादालय जवळील उत्तर द्वारातून, महात्मा फुले बँक समोरुन, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले चौकातून, श्री संत सावता माळी चौक, श्री हरिहर मंदिर जवळून, भीम नगर (तिन पुतळा परिसर), शाळा क्रमांक २ (सावित्रीबाई फुले चौक), फुले नगरातून, श्री प्रगट स्थळ जवळून, सीतामाता मंदिर, लायब्ररी जवळून (श्री गर्गाचार्य मंदिरा समोरुन), पश्चिम गेटमधून श्री मंदिर परिसरामध्ये सायंकाळी ६ वाजेच्या आसपास परत येईल.

**श्रींच्या मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई**

श्रींच्या प्रकट दिन उत्सवानिमित्त श्रींच्या मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंदिर परिसरात केळीचे खांबाचे खुट व आंब्याच्या पानाचे तोरण लावण्यात आले आहेत. मंदिर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी होईल, हे लक्षात घेता व काही अप्रिय घटना घडू नये याची दक्षता म्हणून एकेरी मार्ग करण्यात आला आहे. त्यात श्रींची समाधी दर्शन व्यवस्था, श्री मुखदर्शन व्यवस्था, श्री महाप्रसाद, श्री पारायण कक्ष मंडप, इत्यादी व्यवस्था केली आहे.

# गणरायाच्या चरणी प्रकट दिनी नतमस्तक होण्यासाठी ८० स्केअर फुटाची रांगोळी....





अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथील क्षिती रेवस्कर हिने काढली गजानन महाराजांची रांगोळी..दरवर्षी गजानन महाराज प्रकटदिनी क्षिती रेवस्कर वेगवेगळ्या पद्धतीने रांगोळी काढत असते.यावर्षी तिने गजानन महाराजांचे विजय ग्रंथ पारायण मधील अध्याय दहावा यातील रांगोळी साकारली..गजानन महाराजांचे गाईसोबत असलेले चित्र रेखाटन यावेळी तिने केले.ही रांगोळी काढण्यासाठी तिला १४ तासाचा अवधी लागला रांगोळी पाहण्यासाठी परिसरातील नागरिकांनी गर्दी केली होती.

# पेसा क्षेत्रातील तात्पुरती कंत्राटी शिक्षक पद भरती

## अमरावती जिल्ह्यातील १२० कंत्राटी शिक्षक चार महिन्यांपासून मानधना शिवाय : प्राथमिक शिक्षक समितीचे शालेय शिक्षणमंज्यांना निवेदन : कंत्राटी शिक्षकांची अमरावती जि.प.वर धडक : मुख्य कार्यकारी अधिकारी संचिता मोहपात्र यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक पुणे यांच्या आदेशाने पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये कोणत्याही संवर्गातील उमेदवारांना कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरूपात शिक्षक म्हणून आदेशानुसार अमरावती जिल्ह्यातील धारणी, मेळघाट, चिखलदरा या तालुक्यातील शाळांत १२० उमेदवारांना नियुक्ती दिलेली आहे. पेसा क्षेत्रात नियुक्ती दिलेल्या या कंत्राटी शिक्षकांना आदेशात नमूद केल्यानुसार दरमहा रु. २० हजार मानधन अनुज्ञेय आहे.मात्र सदर १२० कंत्राटी शिक्षकांना नियुक्तीपासून (सप्टेंबर २०२४) आजतागायत कोणतेही मानधन अदा करण्यात आले नाही. पेसा क्षेत्रातील दुर्गम भागातील शाळेत अध्यापनाचे कार्य करणाऱ्या १२० कंत्राटी शिक्षकांना मागील चार महिन्यापेक्षा अधिक कालावधीपासून मानधनापासून वंचित ठेवणे अनाकलनीय, अन्यायकारक आणि अमानवी असल्याची महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती ची



ठाम धारणा आहे. या शिक्षकांनी अमरावती जिल्हा परिषदेकडे वारंवार पाठपुरावा करूनही त्यांना मानधन मिळाले नाही असे संबंधित शिक्षकांनी शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार व जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे यांच्या नेतृत्वात मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्र व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदना व्दारे कळविले आहे.या गंभीर बाबीची दखल घेऊन १२० कंत्राटी शिक्षकांचे मानधन त्वरित अदा होण्यासाठी आवश्यक निर्देश संबंधितांना देण्याची विनंती महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शालेय शिक्षण मंत्री,शिक्षण राज्यमंत्री, प्रधान सचिव- शालेय शिक्षण, उपसचिव - शालेय शिक्षण, शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक प्राथमिक,शिक्षण उपसंचालक प्राथमिक यांना निवेदना व्दारे केली आहे.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

कंत्राटी शिक्षकांची अमरावती जि.प.धडकनियुक्ती ही पेसा क्षेत्रातील प्राथमिक व पूर्व माध्यमिक जिल्हा परिषदेच्या शाळांवर कंत्राटी शिक्षक म्हणून झाली आहे सदर शिक्षकांना जिल्हा परिषद अमरावती कार्यालय तर्फे ५ सप्टें २०२४ रोजी आदेश प्राप्त झाला व ते शाळेवर रुजू झालो असून आज पावेतो तब्बल ५ महिने होऊन गेले तरीही आम्हाला आमचे मासिक मानधन मिळाले नाही तरी माहे सप्टें, आक्टो, नोव्हे, डिसें. जानेवारी महिन्याचे एकत्रित मानधनदेण्याची मागणी केली आहे. पेसा क्षेत्रातील दुर्गम व अतिदुर्गम आगात काम करत असतांना अनेक आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो,वेतन न मिळाल्यामुळे या शिक्षकांवर कर्जाचा डोंगर झाला आहे.तात्काळ वेतन मिळावे अशी मागणी कंत्राटी शिक्षकांनी केली आहे.

# उद्यापासून दहावीची परीक्षा, राज्यातून १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थी देणार परीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०पुणे**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या माध्यमांतून राज्यभरात उद्या २१ फेब्रुवारी २०२५ पासून दहावीची परीक्षा सुरू होत आहे. तर परीक्षेला १६ लाख ११ हजार ६१० विद्यार्थी बसले आहेत. तर यामध्ये ८ लाख ६४ हजार १२० मुले, ७ लाख ४७ हजार ४७१ मुली, तर १९ ट्रान्सजेंडर परीक्षा देणार आहेत. अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत दिली. तर २३ हजार ४९२ माध्यमिक शाळांमधून विद्यार्थ्यांची नोंदणी केली आहे. तर ५ हजार १३० मुख्य केंद्रांवर परीक्षा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शरद गोसावी म्हणाले, उद्या होणाऱ्या दहावीच्या परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून राज्यातील ७०१ केंद्रांतील संपूर्ण स्टाफ बदलण्यात आला आहे. त्यामध्ये पुणे १३९, नाशिक ९३, नागपूर ८६, मुंबई १८, कोल्हापूर ५४, लातूर ५९ या विभागाचा समावेश करण्यात आला आहे. तर राज्यातील परीक्षा केंद्रावर जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेराव्दारे निगराणी राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# 'समृद्धी'वर आणखी एक भीषण अपघात दोन प्रवाशांचा होरपळून मृत्यू, एक गंभीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०बुलढाणा**



लोकार्पण झाल्यापासून अपघाताने गाजत असलेल्या समृद्धी महामार्गावर आज झालेल्या भीषण अपघातात दोन प्रवाशांचा होरपळून दुर्दैवी मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी आहे. आज गुरुवारी सकाळी ही दुर्घटना घडली. हिंदूहृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावरील दुसरबीड (तालुका सिंदखेड राजा, जिल्हा बुलढाणा )येथे ही भीषण दुर्घटना घडली.

या भीषण अपघाताचा विस्तृत तपशील अद्याप मिळाला नाही. प्राप्त प्राथमिक माहितीनुसार चारचाकी प्रवासी वाहनाने अचानक पेट घेतला. पाहता पाहता संपूर्ण वाहन आगीच्या भक्ष्यस्थानी सापडले. यात दोन जणांचा होरपळून करूण अंत झाला. तिसरा प्रवासी गंभीर रित्या जखमी झाला आहे. पोलीस, महामार्ग पोलीस, विशेष रुग्णवाहिका, अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले आहे. हे चारचाकी वाहन मुंबई येथून अकोलाकडे जात होते. वाहनाने अचानक पेट घेतला आणि मोठा आवाज झाल्याने आजूबाजूच्या शेतातील गावक-यांनी घटनास्थळी धाव घेतली. वृत लिहिस्तोवर कार विझविण्यात आली असून समृद्धी मार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आली आहे.

दरम्यान, स्व. बाळासाहेब ठाकरे समृद्धी द्रुतगती महामार्ग आता मृत्यूचा म्हणजेच अपघाताचा मार्ग ठरत आहे. समृद्धी महामार्गावर अपघातांचे सत्र थांबता थांबत नसल्याचे चित्र आहे. वाशीम जिल्ह्यात समृद्धी महामार्गावर तीन दिवसात चार अपघात झाले. या अपघातांमध्ये चार जणांचा बळी गेला, तर अनेक जण जखमी झाले. महाकुंभमेळासाठी जाणारे भाविक देखील अपघातग्रस्त होत असल्याचे समोर आले. समृद्धीवर सातत्यपूर्ण घडणाऱ्या अपघातांमुळे महामार्गाच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह लागले आहे.

कुंभमेळासाठी प्रयागराज येथे जाण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने समृद्धी महामार्गावरून प्रवास करीत आहेत. १८ फेब्रुवारीला कारंजा तालुका हद्दीत समृद्धी महामार्गावर दोन वेगवेगळ्या अपघातांत तीन जण जखमी झाले आहेत. पहिला अपघात नागपूरकडे जाणाऱ्या महामार्गावर चॅनल १६४ वर घडला. छत्रपती संभाजीनगरहून प्रयागराजला जात असलेल्या (क्र. एम.एच. ०२ डी.आय. ५८७८) चारचकीचे ॲक्सेल तुटल्याने ती दुभाजकाला धडकली. यात एक जण जखमी झाला. दुसरा अपघात मुंबईकडे जाणाऱ्या चॅनल १७३ वर घडला. चारचाकीने (क्र. २२ बी. एच. ३३५७ ए) प्रयागराजहून पुण्याला परतांना अचानक नीलगाय समोर आल्याने अपघात झाला. यात संकल्प कल्याणकर (३२) आणि मयुरी कल्याणकर (३०) हे दोघे जखमी झाले. जखमींवर उपचार करण्यात आले.

# संत श्रेष्ठ श्री.गजानन महाराज प्रकट दिनानिमित्य नवनीत राणा यांनी घेतले विविध भागातील गजानन महाराजांचे दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

शहर तसेच ग्रामीण भागातील गजानन महाराज मंदिरात जाऊन घेतले दर्शनसर्व सामान्य, गोर - गरीब, शेतकरी - शेतमजुरांच्या सुख समृध्दीसाठी संत गजानन महाराजांकडे केली प्रार्थनाअमरावती - आज सर्वत्र संत श्रेष्ठ श्री.गजानन महाराज प्रकट दिन गावा-गावात शहरात ज्या-ज्या ठिकाणी गजानन महाराजांचे मंदिर असेल त्या ठिकाणी भाविक भक्तांव्दारे मोठया श्रध्देने व उत्साहाने गजानन महाराज प्रकट दिन साजरा करण्यात येत आहे.



अध्यात्माचा वसा घेऊन व खर्या अर्थाने संत व देवांवर विश्वास ठेवुन जनतेची सेवा करणारे आ.रवि राणा व भाजपा स्टार प्रचारक माजी खासदार नवनित राणा या दाम्पत्यांनी अमरावती शहरातील तसेच विविध ठिकाणी असलेल्या संतश्रेष्ठ श्री.संत गजानन महाराज मंदिरात जावुन दर्शन घेतले. त्याचप्रमाणे आरती सुध्दा केली. यावेळी गजानन महाराजांच्या चरणी नतमस्तक होवुन सर्वसामान्य गोर-गरीब, शेतकरी शेतमजुरांच्या सुख समृध्दीसाठी साकडे घालुन प्रार्थना केली.

यामध्ये गोदावरी कॉलनी, दस्तुर नगर, मालु लेआऊट, मंगलधाम कॉलनी, प्रशांत नगर, केडीया नगर, सुशिल नगर, भुतेश्वर चौक, स्वस्तीक नगर, कृष्णार्पण कॉलनी, क्रांती कॉलनी, हनुमान नगर, खोलापुरी गेट, रसुलापुर, भातकुली, पार्वतीनगर, छाया कॉलनी, म्हाडा कॉलनी, साई नगर, वृदावंन कॉलनी, शिवाजी नगर, जुनीवस्ती बडनेरा, वडगांव माहोरे, गोपाल नगर, स्वागतम कॉलनी, विलास नगर, नांदगाव पेठ, चिचफैल इत्यादी ठिकाणचा समावेश आहे.

# पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग आणि मॅनेजमेंट येथे श्री संत गजानन महाराज प्रकट दिनाचा सोहळा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजीनियरिंग आणि मॅनेजमेंट येथे श्री संत गजानन महाराज प्रकट दिन मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.कार्यक्रमाची सुरुवात श्रींच्या प्रतिमेची पूजा व सामूहिक स्तोत्र पठणाने करण्यात आली यान्तर श्रींची



महाआरती करत पुष्पांजली अर्पण करण्यात आले. यान्तर महाविद्यालय परिसरात भजन आणि कीर्तनाचे आयोजन झाले. श्रींच्या जीवनकार्यावर आधारित प्रवचनाने उपस्थितांना आध्यात्मिक मार्गदर्शन मिळाले.कार्यक्रमानंतर सर्व उपस्थितांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. हा पवित्र सोहळा महाविद्यालयात भक्तिभावाने पार पडला आणि उपस्थितांना अध्यात्मिक आनंदाचा अनुभव मिळाला.